# संपादकीय

## ग्रंथव्यवहाराचे जागतिकीकरण

नवी दिल्लीच्या प्रगती मैदानावर फेब्रुवारीत झालेल्या आंतरराष्ट्रीय ग्रंथजत्रेने बदलत्या ग्रंथव्यवहाराचे व्यापक दर्शन घडविले. अनेक देशांतील नामवंत प्रकाशक आता या भारतीय बाजारपेठेत उत्सुकतेने सहभागी होतात; अनेक चर्चासत्रात भाग घेतात; भारतीय पुस्तकांबद्दल आस्था दाखवतात आणि आपल्या पुस्तकांचे भारतात व भारतीय भाषांत वितरण व्हावे यासाठी प्रयत्न करतात. भारताच्या ९७ कोटी लोकसंख्येतील उच्चशिक्षितांची संख्याही दहा बारा कोटी ठरते, येथील मध्यमवर्ग हा वीस कोटीच्या दरम्यान आहे. ही संख्या अमेरिका वगैरे मोजके देश वगळता बहुसंख्य देशांच्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यामुळे भारतातील प्रचंड बाजारपेठेचे आकर्षण सर्वच बहुराष्ट्रीय कंपन्यांना वाटते. ग्रंथप्रकाशक व इलेक्ट्रॉनिक प्रकाशक यांचाही त्याला अपवाद नाही. नव्या दिल्लीतल्या ग्रंथजत्रेतील परदेशी प्रकाशनसंस्थांची उपस्थिती हे त्याचेच एक गमक आहे.

भारतातील ग्रंथजत्रेला एवढा मोठा प्रतिसाद अन्य देश देतात ही अभिमानाची गोष्ट आहे यात शंकाच नाही. या बहुराष्ट्रीय संपन्न प्रकाशनसंस्थांच्या भारतातील मुक्त संचारामुळे आपला ग्रंथव्यवहार खूप वाढू शकेल यातही काही आश्चर्य नाही. तथापि भारतातील इंग्रजी भाषेत पुस्तके काढणारे प्रकाशक तसेच प्रांतीय भाषांत पुस्तके काढणारे प्रकाशक या वाढत्या ग्रंथव्यवहाराच्या झंझावातात कुठल्या कुठे कोपऱ्यात फेकले जातील अशी शक्यता दिसते. पाश्चात्यप्रकाशन संस्थांकडे असणारे मुबलक भांडवल, त्यांच्या पुस्तकांचा दृष्ट लागण्याजोगा निर्मिती दर्जा, त्यांच्या पुस्तकातील माहितीचा अद्ययावतपणा, त्यावर होणारे काटेकोर संपादकीय संस्कार, त्यांच्या वितरणव्यवस्थेची कार्यक्षमता आणि नवनव्या योजना राबवून प्रसिद्धीच्या झोतात राहण्यातील त्यांची व्यावसायिक कुशलता यामुळे त्यांच्या पुस्तकांचा उठाव अधिक प्रमाणात होतो. किंमती जास्त असूनही ही पुस्तके त्यांच्या अनुभवसिद्ध विक्रीयंत्रणेमुळे चांगली खपतात. त्यामुळे आपल्या भारतीय पुस्तकांच्या खपावर प्रतिकूल परिणाम होण्याची दाट शक्यता आहे; आणि भारतीय भाषांतील पुस्तकांचे तर त्यामुळे केवळ घरेलू धंद्यात रूपांतर होण्याचे भयही अवास्तव नाही.

वॉल्ट डिस्ने कॉर्पोरेशनतर्फे महाराष्ट्र टाइम्समध्ये दर आठवड्याला एक रंगीत पानभर मजकूर जाहिरात म्हणून दिला जातो. वॉल्ट डिस्ने यांनी काढलेले बालचित्रपट (कार्टून फिल्म्स) अत्यंत गाजलेले आहेत. आणि वर्षानुवर्षे ते आपली लोकप्रियता टिकवून आहेत. वॉल्ट डिस्ने याने मुलांसाठीही शेकडो पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत. उत्तम चित्रे, उत्तम छपाई, उत्तम बांधणी यामुळे जगभरचे पालक आपल्या मुलांना ती आवडीने घेऊन



देतात. भारतातही या पुस्तकांचा खप वाढत आहे. या पुस्तकांच्या तुलनेने भारतीय प्रकाशकांनी काढलेली बालवाङ्मयाची पुस्तके फारच सपक ठरतात. भारतीय भाषांतील पुस्तके तर अगदीच फिकी पडतात. साहजिकच वॉल्ट डिस्ने यांच्यासारख्या मातब्बर चित्रपट-प्रकाशन संस्थेच्या भारतातील मुक्त संचारामुळे आपल्या भारतीय बालवाङ्मयाच्या खपाला नजिकच्या भविष्यकाळात ओहोटी लागत राहणार असे म्हटले तर ते भय अनाठायी म्हणता येणार नाही.

पेंग्विन (इंडिया), हार्पर कॉलिन्स यासारख्या आंतरराष्ट्रीय प्रकाशनसंस्था आता भारतीय लेखकांची पुस्तके मोठ्या प्रमाणावर काढण्याच्या प्रयत्नात आहेत. पेंग्विनने एखाद्या भारतीय लेखकाच्या गाजलेल्या कादंबरीचा वा पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद काढला तर त्या लेखकाला लगेच मान्यता मिळते, त्याचा गाजावाजा देशातल्याच नव्हे तर परदेशातल्या वृत्तपत्रांतही होत राहतो; त्याचे महत्त्व एकदम वाढते. तेच पुस्तक जर भारतीय प्रकाशकाने काढले तर त्याची दखलही कोणी फारशी घेत नाही. अर्थात पेंग्विनसारख्या संस्थेचे प्रकाशन क्षेत्रातील दीर्घकालीन अनुभवसंचित एखाद्या लेखकामागे उभे राहते, तेव्हा त्याची प्रतिष्ठा उंचावणे हे स्वाभाविकच आहे. परंतु भारतीय प्रकाशकांना आपले दुय्यम स्थान सांभाळणेही त्यामुळे दुष्कर होत जाणार आहे हेही नजरेआड करता येत नाही. भारतीय प्रकाशकांनी आपल्या व्यावसायिक कार्यक्षमतेत अधिक जोमदार शिस्त आणायचीही गरज त्यामुळे अधोरेखित होते.

भारतीय ग्रंथव्यवहारात आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थांचा मोठ्या प्रमाणावर प्रवेश होणार हे दिल्लीतल्या ग्रंथजत्रेवरून लक्षात येते. त्यामुळे येथील स्थानिक प्रकाशन संस्थांना अधिक सजग राहून आपल्या ग्रंथांचा आशय व निर्मिती या दृष्टीने दर्जा वाढवावा लागेल, शिवाय वितरण व प्रसिद्धी यंत्रणाही अधिक प्रभावी बनवाव्या लागतील. सांस्कृतिक परंपरा-रंजन-समाज चित्रण, मानवी संचित यांचे भांडार पुस्तके खुले करतात. पुस्तके म्हणजे ज्ञान. ते आपल्याला पावलोपावली लागते. तेव्हा पाश्चात्य पुस्तकांना मज्जाव करा असे कोणीच म्हणणार नाही. तो आत्मघातकीपणा ठरेल. परंतु आपणही पुस्तके उत्तम रीतीने काढून आशिया - आफ्रिका यातील आपल्यापेक्षा अप्रगत असलेल्या देशांना पाठवू शकतो; आपल्याकडे प्राचीन परंपरेने आलेले ज्ञानही साक्षेपी संपादनाद्वारे जगभर उपलब्ध करून देऊ शकतो. या दिशेनेही प्रयत्न होण्यास अवसर आहे.

ग्रंथव्यवहाराचे हे जे जागतिकीकरण होत आहे त्याची चुणूक दाखवणारी नवी दिल्लीची ही ग्रंथजत्रा भारतीय प्रकाशन व्यवसायालाही नवे भान व नवी दृष्टी देणारी ठरते.

– संपादक

# साहित्य वार्ता

## जीवनाकडे दोन्ही दृष्टींनी पाहता यायला हवे : मिरासदार

''लेखकाला आयुष्यात येणाऱ्या अनुभवांकडे हलक्याफुलक्या आणि गंभीर या दोन्ही दृष्टिकोनांनी पाहता आले पाहिजे. प्रत्यक्ष लेखनात त्यातला एक प्रकार उतरला तरी ते लेखन दमदार होते. त्यासाठी लेखकाजवळ या दोन्ही शक्ती असायला पाहिजेत,'' असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांनी व्यक्त केले.

संजय नाईक यांनी लिहिलेल्या 'आगामी आकर्षण' आणि 'पाश' या कादंबऱ्यांचे प्रकाशन करताना ते बोलत होते. 'सकाळ पेपर्स'चे सरव्यवस्थापक के. मो. भिडे अध्यक्षस्थानी होते. श्री. भिडे म्हणाले, ''नाईक यांचे कुटुंब अतिशय हलाखीच्या परिस्थितीतून पुढे आले आहे. संजय नाईक यांनी स्वत:चे शिक्षण पूर्ण केले. कौटुंबिक जबाबदारी सांभाळून त्यांनी लेखन केले व वाढविले. त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन होते आहे, हा आयुष्यातील एक मोठा टप्पाच त्यांनी गाठला आहे.'' नीहारा प्रकाशनाच्या स्नेहसुधा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले.

## काळसेकरांच्या 'विलंबित'ला कुसुमाग्रज पारितोषिक

''मराठी भाषा टिकवण्याच्या दृष्टीने मूलभूत चिंतनात्मक लिखाणाबरोबरच विविध प्रकारचे वाङ्मयही मराठीमध्ये निर्माण व्हायला हवे'', असे मत महाराष्ट्राचे टाइम्सचे संपादक कुमार केतकर यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषद आणि मुंबई जागतिक मराठी अकादमीच्या वतीने कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या वाढदिवसानिमित्त २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात पुण्याच्या कॉन्टिनेंटल प्रकाशन पुरस्कृत दीड हजार रुपयांचे कुसुमाग्रज पारितोषिक कवी सतीश काळसेकर यांना 'विलंबित' या काव्यसंग्रहासाठी देण्यात आले.

'मराठी : आजची व उद्याची' या विषयावर बोलताना केतकर म्हणाले, ''लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्यानंतर एकही मूलभूत चिंतनात्मक ग्रंथ मराठीत झाला नाही, आपल्याकडे मराठी भाषा वाचवण्यासंबंधीची ओरड केली जाते. शासनाकडे न्यायालय, मंत्रालयातील कारभार मराठीतून करण्याची मागणीही केली जाते. पण, भाषा केवळ राजाश्रयाने वाढत नाही. कामगार, शेतकरी यांच्या विचारांचे प्रगटीकरण आणि त्याबरोबरच आपल्याकडे संतांच्या चिंतनाचा व त्यातून झालेल्या लिखाणाचा संस्कार यातून ती वाढली व टिकली. पण, आज मराठीतून चिंतनात्मक लिखाण होत नाही आणि विचारांची देवघेवही मराठीतून होत नाही. विवक्षित विषयांवर पाश्चात्य भाषांमधील अभ्यासाचाच आधार घेतला जातो.

''कोणत्याही विषयातील मूलभूत चिंतनासाठी कोणी आज मराठीकडे वळताना दिसत नाही. एखाद्या विषयाबद्दल मराठी भाषेत येणारी पुस्तके बोजड तरी असतील वा त्यापेक्षा सोप्या भाषेत हीच माहिती अन्य भाषांत सहज उपलब्ध होत असेल. त्यामुळेच या संदर्भात आजच्या तरुण पिढीलाही नावे ठेवता येणार नाहीत, तसेच आज सुसंस्कृत अभिजन वर्गातील मुलांपेक्षा दलित वर्गातून येणारे तरुण अधिक चांगले, शुद्ध, सुवाच्य लिहिताना दिसत आहेत. अभिजन वर्गाला भाषेबद्दल असणारी आस्था, हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. अभिजन समाजाला भाषेबद्दल फारसे काही वाटत नसेल आणि वर येऊ पाहणारा वर्ग ही भाषा आपलीशी करत असेल, तर मराठी भाषा बहुजनांची होण्याची प्रक्रियाही सुरू झाली आहे, असेच म्हणावे लागेल.''

''दिवस अंधारून येतात, तेव्हाही गाणं असेल का?, होय तेव्हाही गाणं असेल; अंधांच्या दिवसाचं'', या ब्रेख्तच्या कवितेने प्रेरणा दिली आणि त्यामुळेच माणसाचं भलं व्हावं यासाठी व कविता लिहिण्याचा आनंद मिळावा यासाठी कविता लिहितो असे मनोगत कवी काळसेकर यांनी व्यक्त केले.

## 'प्रियवंदा'च्या संपादिका उषा कर्वे यांचे निधन

सुप्रसिद्ध अभिनेत्री आणि प्रियवंदा मासिकाच्या संपादिका उषा कर्वे यांचे अल्पशा आजाराने मुंबईत निधन झाले. त्यांच्यामागे मुलगा, कन्या व नातवंडे असा परिवार आहे.

झुंजारराव, बेबंदशाही, सौभद्र या नाटकांमधून त्यांनी केलेल्या भूमिका गाजल्या होत्या. रूपवती अभिनेत्री म्हणून त्यांची ख्याती होती. 'श्री' या स्त्रीसाप्ताहिकाच्या संपादिका म्हणूनही त्यांनी काम केले. त्यानंतर 'प्रियवंदा' हे वार्षिक त्यांनी सुरू केले. हे नियतकालिक गेली २७ वर्षे सुरू होते.

## मराठी-ख्रिस्ती साहित्य संमेलन नागपूरला

मराठी-ख्रिस्ती साहित्य परिषदेतर्फे सतरावे मराठी-ख्रिस्ती साहित्य संमेलन १८ व १९ एप्रिल रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात येणार असून संमेलनाच्या अध्यक्षपदी 'ज्ञानोदय'चे प्रमुख संपादक प्रा. सुधीर देवीप्रसाद शर्मा यांची निवड झाली आहे.

पहिले मराठी-ख्रिस्ती साहित्य संमेलन १८ व १९ एप्रिल १९२७ रोजी मराठी भाषा पंडित रेव्ह. निकल मॅकॅनिकल यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक येथे भरविण्यात आले होते, त्या घटनेला एकाहत्तर वर्षे होत आहेत.

नागपूर संमेलनामध्ये भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील ख्रिस्ती समाजाची कामगिरी आणि विदर्भातील ख्रिस्ती साहित्य परंपरा या विषयांवर शोधनिबंधांचे वाचन होईल. तसेच जागतिकीकरणाच्या परिणामांविषयी परिसंवाद होईल. कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. सिसिलिया कार्व्हलो असतील.

## 'मनी मानसी'ची मकरसंक्रांत

चैतन्य प्रकाशनतर्फे आरोग्यविषयक 'मनी मानसी' हे मराठी मासिक प्रकाशित केले जाते. या प्रकाशन संस्थेने यंदाची मकरसंक्रांत वेगळ्या पद्धतीने साजरी करावी म्हणून एक

अभिनव उपक्रम केला. सुप्रसिद्ध अभिनेत्री निशिगंधा वाड यांच्या हस्ते शिवाजी पार्क, दादर येथील धन्वंतरी रुग्णालयातील सर्व रुग्णांना तीळगूळ सोबत 'मनी मानसी'चा अंक भेट देण्यात आला. या प्रसंगी धन्वंतरी रुग्णालय व 'मनी मानसी' परिवाराशी संबंधित मंडळीही सहभागी झाली होती.

## वि. र. बाम एकांकिका लेखन स्पर्धा

अ. भा. मराठी नाट्यपरिषदेशी संलग्न असलेल्या मराठी नाटककार संघातर्फे बापूसाहेब टिळक यांच्या प्रेरणेने सुरू करण्यात आलेल्या वि. र. बाम एकांकिका लेखन स्पर्धेचे आयोजन यंदाही करण्यात आले आहे. प्रत्येक एकांकिकेसाठी प्रवेश शुल्क रु. ६० आहे. एकांकिकेस विषयाचे बंधन नाही. ती ३० ते ४० मिनिटात सादर करता येईल अशी असावी. ती अप्रकाशित व पूर्वप्रयोग न झालेली असावी. पहिल्या तीन क्रमांकाच्या एकांकिका 'त्रिदल' प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात येतील. प्रथम तीन विजेत्यांस अनुक्रमे रु. ७५०, रु. ५०० व रु. २५० अशी पारितोषिके असून रु. १५० ची सात उत्तेजनार्थ पारितोषिके आहेत. संपर्क : श्रीमती स्नेहल प्र. टिळक, त्रिदल प्रकाशन, राणी बिल्डिंग, प्रार्थना समाज नाका, गिरगाव, मुंबई - ४००००४. दूरध्वनी : ३८५०१९२.

## 'प्राचीन संतवाङ्मयात तुकोबांना बंदिस्त करणे अन्यायाचे'

''कवी म्हणून आपण इतर सामान्यजनांपेक्षा काहीतरी वेगळे आहोत; कवित्व ही एक जबाबदारी आहे याचे भान तुकोबारायांच्या कवितेत एखाद्या आधुनिक भावकवीइतकेच प्रखरपणे जाणवते. त्यामुळे जन्मकाळानुसार प्राचीन संतवाङ्मयात त्यांना बंदिस्त करणे अन्यायाचे ठरते'' असे मत तुकोबारायांचे वंशज असलेले समीक्षक, पुणे विद्यापीठातील तत्त्वज्ञान विभागप्रमुख डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.

मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाने प्राचीन साहित्य व्याख्यानमाला सुरू केली आहे. या मालिकेचे पहिले पुष्प प्रा. म. वा. धोंड यांनी 'ज्ञानेश्वरी'वर गुंफले, महाराष्ट्रीय संस्कृतीच्या दृष्टीने 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' हा अनुबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. दुसरे पुष्प 'तुकोबांच्या कविते'वर डॉ. मोरे यांनी गुंफले. प्रारंभी विभागप्रमुख डॉ. वसंत पाटणकर यांनी, 'तुकारामदर्शन' या ग्रंथाला भैरुरतन दमाणी व महाराष्ट्र फाऊंडेशन - हे दोन पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. मोरे यांचा सत्कार केला.

''मराठी कवितेत कवीचे आत्मभान अव्वल इंग्रजीच्या काळातच प्रथम 'आम्ही कोण म्हणूनि काय पुसता?' विचारणाऱ्या कवी केशवसुतांपासून प्रकटले असे मानणे चुकीचे आहे. तसेच तेराव्या शतकातील ज्ञानदेवापासून १७५०च्या निळोबापर्यंतच्या संतकवींच्या रचनांवर 'प्राचीन आध्यात्मिक साहित्य' असा शिक्का मारून त्यांना जुनाट ठरवणे हेही गैर आहे. आपण आता 'तुकोबांची अभंगगाथा' म्हणत असलो तरी, स्वत: तुकोबांनी आपल्या रचनांना कधीही



'अभंग' म्हटले नव्हते; 'कवित्व' हाच शब्द त्यांनी वापरला होता! 'आम्हां घरी धन शब्दांचेच असे' म्हणणाऱ्या तुकोबांनी सत्ताधाऱ्यांपुढे लाळघोटेपणा करणाऱ्यांची परखड संभावना 'तरि का ओळंगती राजदरबारी सुने' अशा शब्दांत केली होती! विनम्र वृत्तीच्या संतकवींचे एक वैशिष्ट्य म्हणजे, आपल्या कवित्वाचा कार्यकारणभाव प्रतिभाशक्तीत न शोधता, तो गुरुप्रसादात ते शोधत राहिले,'' तुकोबांच्या कवितेतील शब्दाशब्दाला स्वानुभूतीचे तारण असल्यामुळे, आज ३५० वर्षानंतरही, त्यांची कविता प्रगाढ विद्वान शब्दप्रभू उच्चभ्रूंपासून अतिसामान्यांपर्यंतच्या सर्व मराठी माणसांच्या अनुभूतीचा एक भाग होऊन राहिल्याचे आढळते. म्हणूनच त्यांच्या कवितेत सुभाषितप्राय अलंकारिकता नसूनही, तिच्यात उदंड अवतरणक्षमता आढळते,'' असेही निरीक्षण त्यांनी नोंदवले.

## 'खांडेकरांचा वचक वाटे; तसाच आधारही वाटे –श्री. पु. भागवत

''वाङ्मयीन वातावरण निकोप राहायचे असेल तर, वेगळी वाट चोखाळू पाहणाऱ्या एखाद्या धडपड्या संपादकाला ज्यांचा वचक वाटेल नि आधारही वाटेल, अशा ऋषितुल्य ज्ञानवृद्ध साहित्यिकांचे अस्तित्व समाजात आवश्यक असते! गेली ५२ वर्षे 'मौज'मधून संपादनाची धडपड करताना वा. ल. कुलकर्णी यांच्याप्रमाणेच वि. स. खांडेकरांनीही असा वचक व आधार मला दिला'' असे श्री. पु. भागवत यांनी कृतज्ञतापूर्वक सांगितले.

वि. स. खांडेकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त, मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाने डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ सोशल अँड इकॉनॉमिक चेंज या संस्थेच्या सहकार्याने, खांडेकर-साहित्यावरील दोन दिवसांचे एक चर्चासत्र घेतले. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. मे. पुं. रेगे यांनी दीप प्रज्वलित करून व खांडेकरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून चर्चासत्राचे उद्घाटन केले. मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. नरेश चंद्र यांच्या हस्ते, जी. आर. भटकळ फाऊंडेशनतर्फे सदानंद भटकळ यांनी नाईक भवनाच्या आवारात भरवलेल्या खांडेकरांचे साहित्य व छायाचित्रे-प्रदर्शनाचे उद्घाटनही या वेळी झाले.

विभाग प्रमुख डॉ. वसंत पाटणकर म्हणाले : ''खांडेकरांनी विपुल लेखन केले, पण तसे विपुल लेखन इतर अनेक लेखकांनी केले आहे. तथापि साहित्यिक म्हणून खांडेकरांचे वैशिष्ट्य म्हणजे, समीक्षकांनी त्यांच्या साहित्यावर परखड टीका करूनही, खांडेकरांना त्यांच्या समकालीन व आजच्या वाचकांकडूनदेखील विलक्षण प्रतिसाद लाभला. आजही वाचकपसंतीच्या चाचणीत पहिल्या क्रमांकाचा कौल खांडेकरांच्या 'ययाती'ला लाभतो. त्यामुळे खांडेकर ही एक व्यक्ती उरत नाही. मराठी वाङ्मयेतिहासातील ते एक सांस्कृतिक शिखर ठरतात. म्हणून त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन करताना आपली सांस्कृतिक मूल्येही तपासून घेण्याची गरज आहे.'' आंबेडकर संस्थेचे अध्यक्ष डॉ. भालचंद्र मुणगेकर म्हणाले की, गेली ५० वर्षे खांडेकरांच्या साहित्याद्वारे मराठी मनांवर जो प्रगल्भतेचा संस्कार झाला, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे चर्चासत्र आहे.

श्री. पु. भागवत पुढे म्हणाले : एक प्रतिभावंत साहित्यिक म्हणून खांडेकर किती थोर

होते, हा कदाचित काहीजणांच्या दृष्टीने वादाचा मुद्दा होऊ शकेल. पण गेल्या ५२ वर्षांत त्यांचा जो व्यक्तिगत अनुभव मला आला त्यावरून एक गोष्ट मात्र मला निर्विवादपणे मांडावीशी वाटते – वाङ्मयीन संस्कृतीचा खांडेकर एक उत्तम अजोड नमुना होते! असा नमुना त्या काळातही मी दुसरा पाहिला नाही. अन् नंतरही तसा नमुना मला क्वचितच भेटला! विशीच्या उंबरठ्यावर असताना त्यांच्या 'क्रौंचवधा'वर मी प्रतिकूल परीक्षण 'मौज' साप्ताहिकात टोपण नावाने लिहिले तरी न रागावता, आपले प्रकाशक रा. ज. देशमुख यांना त्यांनी मला भेटीला आणायला सांगितले. पुण्याला प्रत्यक्ष भेट झाली तेव्हा 'शारदा' नाटकाचे पुन:पुन्हा वाचन करताना प्रत्येक वेळी नवनवे कसे गवसत जाते, असे सांगून आस्वादक समीक्षेचा एक सखोल संस्कार त्यांनी माझ्या मनावर केला. पुढे 'सत्यकथे'साठी लिहिताना, माझ्या पोरवयाचा विचार न करता, संपादक म्हणून अतीव सन्मानाने मला ते वागवत राहिले! त्यांचे मला जाणवलेले विलक्षण मोठेपण म्हणजे, कुसुमाग्रजांचा 'विशाखा' स्वत: पुढाकार घेऊन प्रकाशित करणारे, पाडगावकरांच्या 'धारानृत्या'चे समीक्षण स्वत: होऊन हौसेने 'सत्यकथे'त करणारे, रा. भा. कुलकर्ण्यांसारख्या अप्रसिद्ध लेखकाचे साहित्यही चोखंदळपणे वाचणारे खांडेकर नामवंत युरोपियन लेखकांचे साहित्यदेखील कुतूहलापोटी मोठ्या उत्साहाने वाचत असत. त्यांच्याविषयी लिहीत असत. आजच्या पिढीतील लेखकांनी फारसे वाचलेले नसते, असे हस्तलिखिते वाचताना जाणवते. तेव्हा खांडेकरांचे मोठेपण मनावर अधिकच ठसते.

## कुसुमाग्रज - सरकारी भिंतीवरी!

लाख लाख जन माझ्यासाठी जळले मेले विसरू नका ।

मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी धरू नका ।। ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कुसुमाग्रज यांची 'स्वातंत्र्यदेवीची विनवणी' ही कविता आता मंत्रालय व राज्य सरकारच्या ठिकठिकाणच्या कार्यालयात भिंतीवर विराजमान होणार आहे. स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त अनंत फंदींच्या 'प्रासंगिक फटका' धर्तीवर लिहिलेली ही कविता सद्य:स्थितीवर कोरडे ओढीत डोळ्यात अंजन घालणारी आहे. मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना ही कविता इतकी आवडली की ती सरकारी कार्यालयात लावण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. एखाद्या मंत्राचे सामर्थ्य प्राप्त झालेल्या या कवितेची ५० हजार पोस्टर्स छापून तयार झाली आहेत.

''मला पूर्वीसारखी पुस्तके वाचायला आता सवड मिळत नाहीत. फायलीच जास्त वाचायला लागतात; पण एकेका फायलीत केवढे वाङ्मय भरलेले असते!'' असे उद्गार मनोहर जोशी यांनी आयडियल बुक डेपोच्या हीरक महोत्सवात काढले होते. जनसंपर्क खात्यातील एका काव्यप्रेमी महिला अधिकाऱ्याने एका बैठकीत मुख्यमंत्र्यांचे या कवितेकडे लक्ष वेधले. ही कविता वाचून मनोहर जोशी प्रभावित झाले. 'जनसेवेस्तव असे कचेरी ती डाकूंची नसे गुहा, मेजाखालून मेजावरतून द्रव्य कुणाचे लुटू नका' किंवा 'एकविसावे शतक समोरी सोळाव्यास्तव रडू नका' कधीतरी घरगुती प्रसंगावर कविता रचणारे मनोहर जोशी वरील कवितेने भारावून गेले. या



कवितेचे पोस्टर काढावे ही अधिकाऱ्यांनी केलेली सूचना तात्काळ त्यांनी मंजूर केली.

ही कविता पोस्टरसाठी वापरण्यास मंजुरी द्यावी म्हणून वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्याशी साधण्यात आला, त्यावर ''मला 'मान' नको आणि 'धन'ही नको. ही कविता जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचणार यातच मला समाधान आहे'' असे उत्तर त्यांनी दिले.

## यशवंतराव चव्हाण साहित्य व सांस्कृतिक प्रतिष्ठान पुरस्कार

फोंडाघाटचे डॉ. महेश केळुसकर (काव्यसंग्रह 'झिनझिनाट'), सुदेश लोटलीकर ('अवतरण'), मुंबईचे राजन साटम (उजेडाचे तुकडे), सेलूचे विश्वास वसेकर ('पैगाम'), ठाण्याचे प्रा. अशोक बागवे ('आज इसवी सन'), व लासलगावचे प्रकाश होळकर ('कोरडे नक्षत्र') या सहा कवींच्या काव्यसंग्रहांची पुणे येथील यशवंतराव चव्हाण साहित्य व सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या वार्षिक पुरस्कारांसाठी यंदा निवड झाली. रोख एक हजार रुपये व मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप असते.

या मानकऱ्यांखेरीज ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांनाही रोख पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. १२ मार्चला पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात झालेल्या कविसंमेलनात हे पुरस्कार विजेत्यांना दिले गेले. पद्मश्री मिळाल्याबद्दल नारायण सुर्वे यांचा सत्कार बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांच्या हस्ते करण्यात आला.

## मराठी साहित्य संस्कृतीवर दुतर्फी आक्रमण

मराठी साहित्यावर, संस्कृतीवर दुतर्फी आक्रमण सुरू आहे. बाह्य आक्रमण हे इंग्रजी भाषा, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी लादलेल्या चंगळवादातून होत आहे. तर अंतर्गत आक्रमण भाषा व संस्कृती याविषयीच्या न्यूनगंडातून होत आहे असे मत प्रा. स. त्र्यं. कुल्ली यांनी दै. गावकरीच्या वतीने भरलेल्या बुलडाणा जिल्हा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून व्यक्त केले. साहित्याला वाचक हवेत, त्यामुळे लेखक न झाले तरी चालेल पण वाचक होणे महत्त्वाचे आहे. उद्घाटक प्रा. नारायण कुळकर्णी कवठेकर, स्वागताध्यक्ष दत्ता सराफ, आकाशवाणी प्रतिनिधी प्रा. दादा मानकर, प्रा. गोविंद गायकी, दा. गो. काळे, रमेश इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या संमेलनात कथाकथन, दोन परिसंवाद, कविसंमेलन, आदी कार्यक्रम घेण्यांत आले.

## शेकडो ग्रंथ एकत्र पाहणे हा बौद्धिक संस्कार –डॉ. फडकुले

ग्रंथप्रसारासाठी कार्यरत असलेल्या अक्षरधारा संस्थेतर्फे सोलापूर येथील शुभराय आर्ट गॅलरीत ४७व्या भव्य ग्रंथप्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन दै. तरुण भारतचे संपादक विवेक घळसासी यांनी केले. प्रमुख अतिथी डॉ. निर्मलकुमार फडकुले होते. २६ फेब्रुवारी ते १५ मार्चपर्यंत हे प्रदर्शन चालू होते.

अक्षरधारा चळवळीतले हे तरुण, व्यावसायिक चढउतार सांभाळत हे काम निष्ठापूर्वक करीत आहेत. सुशिक्षितांनी या सांस्कृतिक चळवळीमागे उभे राहून प्रतिसाद द्यावा, प्रत्येक

ग्रंथप्रेमीने या प्रदर्शनातून पुस्तके विकत घेऊन आपला सहभाग व्यक्त करावा, असे आवाहन घळसासी यांनी केले.

उत्तम आशयाची पुस्तके प्रत्येक ग्रंथप्रेमीने संग्रहात ठेवावीत आणि घरामध्ये ज्ञानाचा, विचारांचा आनंद दरवळत ठेवावा. ज्ञानात भर टाकणारे, रंजन करणारे, वेगवेगळ्या विचारांना चालना देणारे, नामांकित लेखकांनी लिहिलेले ग्रंथ अशा प्रदर्शनात एकत्रित पहायला मिळणे हा एक बौद्धिक व मानसिक संस्कार आहे. खाण्यासाठी म्हणून पुस्तक वाचू नका तर पचवण्यासाठी वाचा, यातले काही विचार जर आपल्याला पचले तर आपल्या आणि समाजाच्या व्यक्तिमत्त्वामध्ये उत्तम भर पडेल. जो वाचतो तो स्वत: वाचतो आणि इतरांनाही वाचवतो, वाचन ही एक वाचवण्याची कला आहे, असे आवाहन डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी सोलापूर येथे केले.

या प्रदर्शनात विविध विषयांची वरील वीस हजार पुस्तके होती. हॉटेल प्रथम, मुद्रा, अश्वत्थ कॉम्प्युटर्स, डिसेंट सर्व्हिसेस यांचे सहकार्य या प्रदर्शनाला लाभले. चुंबक चिकित्सेद्वारे रोगनिदान आणि आरोग्यविषयक सल्ला सर्वांना मिळावा अशीही व्यवस्था होती.

## डॉ. व. दि. कुलकर्णी - गौरवग्रंथ

ज्येष्ठ समीक्षक डॉ. व. दि. कुलकर्णी यांना ऑगस्ट १९९८ मध्ये ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त त्यांच्या विद्यार्थ्यांनी वदिंच्या सहवासात हा गौरव ग्रंथ प्रसिद्ध करण्याच ठरवले आहे. त्यांजवरील लेख पुढील पत्त्यावर पाठवावे. डॉ. जयंत वष्ट, ६०६ अ विशाल अपार्टमेंट, १०२ सदाशिव, नागनाथपार, पुणे - ४११ ०३०.

## साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदी रथ

साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक रमाकांत रथ यांची, तर उपाध्यक्षपदी प्रो. गोपीचंद नारंग यांची निवड झाली. अकादमीच्या सर्वसाधारण सभेत हे पदाधिकारी निवडण्यात आले.

या वेळी २२ सदस्यांचे भाषावार कार्यकारी मंडळही निवडण्यात आले. त्याचबरोबर विविध संस्था आणि केंद्र सरकारच्या प्रतिनिधींचीही निवड करण्यात आली.

या भाषावार कार्यकारी मंडळात निवड झालेल्या सदस्यांमध्ये प्रसिद्ध साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे (मराठी) नवकांत बरुआ (आसामी) सुनील गंगोपाध्याय (बंगाली), ओम गोस्वामी (डोंगरी), श्रीमती मानाक्षी मुखर्जी (इंग्रजी), डॉ. रघुवीर चौधरी (गुजराती), डॉ. नामवर सिंग (हिंदी) यांचा समावेश आहे.

## सरकारच्या अनास्थेमुळेच ग्रंथपालांची परवड —रेगे

'प्रशिक्षित ग्रंथपाल उपलब्ध असूनही त्यांची परवड होत आहे', असे परखड मत निवृत्त ग्रंथपाल शां. शं. रेगे यांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि बृहन्मुंबई जिल्हा ग्रंथसंग्रहालय याच्या विद्यमाने मुंबई विभाग ग्रंथपाल संघाच्या वार्षिक अधिवेशनात व्यक्त केले. त्या अधिवेशनाचे



उद्घाटन करताना ते बोलत होते. 'या वर्षाची पुस्तके आली का', या चौकशीपलीकडे सरकार ग्रंथालयांची कोणतीही तपासणी करीत नाही, त्यामुळे सरकारकडून अपेक्षा करणे फोल ठरते. कोणत्याही वाचकाला विन्मुख पाठवायचे नाही, हे धोरण अंगीकारणारा ग्रंथपालच सच्चा असतो, असेही म्हणाले.

अधिवेशनाचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक म्हणाले, ''वाचनाभिरुची ही एक मानसिक प्रक्रिया असते. ती निर्माण होणे हे प्रत्येकाच्या मनोपिंडावर अवलंबून असले तरी, ती वाचनाभिरुची घडवण्याची फार मोठी कामगिरी, प्रशिक्षित ग्रंथपाल बजावू शकतात. वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी ग्रंथालय उपलब्धतेसारखे सुयोग्य वातावरण उपलब्ध असेल तर प्रयत्नपूर्वक वाचक घडवता येतो. एकदा असा वाचक गवसला की, त्याला चांगला वाचक घडवण्याची कामगिरी निष्ठावान ग्रंथपाल सहज बजावू शकतो''.

## वाङ्मयीन नियतकालिके योग्य वाचकांपुढे जाण्याची गरज —मनोहर कदम

'अभिरुची', 'सत्यकथा' या नियतकालिकांनी मागील पन्नास वर्षांच्या कालखंडात काळाचा होरा ओळखून वाङ्मयीन इतिहासात महत्त्वाची जबाबदारी पार पाडली पण पुढील वाङ्मयीन नियकालिकांनी काळाच्या कसोटीवर ही जबाबदारी पाडली नाही, असे उद्‌गार नव्या पिढीतील साहित्यिक श्री. मनोहर कदम यांनी 'अभिरुची' या वाङ्मयीन नियतकालिकाच्या पुनर्प्रकाशन समारंभात बोलताना काढले.

पु. आ. तथा बाबुराव चित्रे व विमल चित्रे यांचे एकेकाळी मराठी वाङ्मयीन जगतात अग्रेसर ठरलेले परंतु आता बंद पडलेले 'अभिरुची' नियतकालिक नव्याने सुरू करण्याची व चालवण्याची जबाबदारी प्राध्यापक विजय जामसंडेकर यांनी घेतली आहे. त्रैमासिकाच्या स्वरूपात निघणाऱ्या या नियतकालिकाचा प्रकाशन समारंभ शुक्रवार दि. ६ मार्च रोजी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगाव येथे पु. आ. चित्रे यांच्या हस्ते झाला. याचवेळी 'अभिरुची'ने प्रसिद्ध केलेल्या सिसिलिया कार्व्हालो यांच्या 'अंतर्यामी' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन मनोहर कदम यांच्या हस्ते झाले.

## ग्रामीण महाराष्ट्रच मराठी भाषा, संस्कृती जोपासेल —शांता शेळके

''साहित्याच्या क्षेत्रातून प्रदीर्घकाळ हद्दपार राहिलेला बहुजनसमाज आता साहित्यातील अभिजन बनल्यामुळे साहित्याचा खऱ्या अर्थाने विस्तार आणि प्रसार झाला. नगर येथे यशवंतराव गडाख यांनी अपार परिश्रम घेऊन जे सर्वसमावेशक संमेलन घडविले, त्यातून मराठी साहित्याला एक निश्चित दिशा मिळाली. मराठी भाषा आणि संस्कृतीपुढे अनेक आव्हाने उभी राहिली असली, तरी ग्रामीण महाराष्ट्रातील मौखिक वाङ्मय मराठी भाषा आणि संस्कृतीचे जतन चिरकाल करील,'' असा विश्वास कवयित्री शांता शेळके यांनी व्यक्त केला. नगरमध्ये गतवर्षी भरलेल्या सत्तराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समग्र आणि सचित्र पुनरानुभव

देणाऱ्या ५०० पृष्ठांच्या 'संवाद' या ग्रंथाचे प्रकाशन अनेक नामवंत साहित्यिक आणि रसिकांच्या उपस्थितीत १५ मार्च रोजी श्रीमती शेळके यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी राम शेवाळकर होते.

७१व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष द. मा. मिरासदार, मावळते अध्यक्ष ना. सं. इनामदार, व्यंकटेश माडगूळकर, डॉ. यु. म. पठाण, मधू मंगेश कर्णिक, नारायण सुर्वे हे संमेलनाचे पूर्वाध्यक्ष या वेळी उपस्थित होते.

७०व्या साहित्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि संवाद ग्रंथाचे संयोजक यशवंतराव गडाख यांनी यावेळी 'संवाद' निर्मितीमागील भूमिका स्पष्ट केली. संमेलनाचा इतिहास जपण्याचा हा प्रयत्न यापुढेही अनुसरला जावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'संवाद'चे संपादक अरुण शेवते, साहित्य महामंडळाचे अध्यक्ष सुधीर रसाळ आदींचीही भाषणे झाली.

*१३व्या वर्ल्ड बुक फेअरमध्ये मा. महाश्वेतादेवी यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या स्टॉलला भेट दिली.*

# पुस्तक परिचय

**पिढ्यानुपिढ्यांना भुरळ घालणारे चौघा बहिणींच्या भावबंधाचे उत्कट चित्रण**

## चौघीजणी

**लुइसा मे अल्कॉट**
**अनु. शांता शेळके**

एकशे तीस वर्षांपूर्वी म्हणजे इ. स. १८६८ मध्ये अमेरिकेत 'लिटल वुमेन' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. लुइसा मे अल्कॉट हिने या कादंबरीत मार्च नामक कुटुंबातील चार बहिणींची जीवनकहाणी सांगितली होती. (ह्या कादंबरीतील बऱ्याच घटना तिच्या स्वत:च्या जीवनातीलच होत्या.) या कादंबरीने अमेरिकेतील वाचकांना झपाटून टाकले. तिच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघाल्या. घरोघर तिची पारायणे होत राहिली. त्यापुढचा भाग गुड वाइव्हज हा लिहिला. अनेक भाषांमध्ये तिची भाषांतरे झाली. तिच्यावर अनेकदा चित्रपट निघाले. तेही गाजले. मराठीत तिचे अनेक लहानमोठे छुपे अनुवाद झाले. ख्यातनाम लेखिका शांता शेळके यांनी युसिसच्या अनुवाद योजनेसाठी या कादंबरीचा १९६९ मध्ये अनुवाद केला. त्याची चौथी आवृत्ती जानेवारी ९८ मध्ये मेहतांनी आकर्षकपणे नव्याने बाजारात आणली आहे. मेहतांच्या उत्तम विक्रीव्यवस्थेमुळे वाचकांचे हे आवडते पुस्तक आता दुर्मिळ राहणार नाही. अमेरिका-इंग्लंडमध्ये आजही हे पुस्तक नवीन बेस्ट सेलर पुस्तकासारखे खपते. एक क्लासिक म्हणून बालपणापासूनच वाचकांच्या मनाचा ते ठाव घेत आले आहे.

शांता शेळके यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे, ''हे पुस्तक शाळकरी वयात माझ्या हाती पडले. त्या वयात ते मला अत्यंत आवडले. ....अनुवाद करताना त्या बहिणींशी पुन्हा एकदा जवळीक साधल्याच्या आनंद मला लाभला. 'चौघीजणी' या अनुवादालाही चांगली लोकप्रियता मिळाली. तरुण मुलामुलींनी तर त्याचे मन:पूर्वक स्वागत केलेच, प्रौढांनाही त्याने विशेष प्रकारचा आनंद दिला. याचे श्रेय माझ्या अनुवाद कौशल्यापेक्षाही मूळ पुस्तकाच्या वाङ्मयीन आणि भावनिक संपन्नतेला द्यायला हवे. उत्तम व्यक्तिचित्रण, वेधक संवाद, कौटुंबिक भावसंबंध हृद्यता, नितळ कोवळ्या वयातल्या स्नेहामधली निर्भर उत्कटता, प्रसन्न विनोद अशा विविध गुणांमुळे हे पुस्तक अतिशय रसाळ आणि चित्ताकर्षक झाले आहे. ज्यो हे लेखिकेचेच प्रतिरूप आहे. तिची साहित्यक्षेत्रातील प्रारंभिक धडपड, बहिणीबहिणीतील प्रेम आणि भांडणे, शेजारच्या लॉरीशी या चौघी बहिणींचा जडलेला स्नेह, बेथचा अकाल मृत्यू, मेगचे वैवाहिक जीवनातले प्रारंभीचे अनुभव असे कितीतरी सुंदर तसेच हेलावूनही टाकणारे प्रसंग या कादंबरीत आहेत. एका खोल अर्थाने हे पुस्तक नीतिमूल्यांचा संस्कार वाचकांवर घडवते, पण तसे करताना कुठेही ढोबळ बटबटीतपणाने उपदेश करीत नाही किंवा कंटाळवाणे होत नाही. दीडशे वर्षांपूर्वीचे अमेरिकेतले वातावरण पार्श्वभूमी म्हणून असले तरी ही कहाणी आजही आपल्या भावनांना आवाहन करते, कारण तिच्यातील व्यक्तिरेखा, त्यांचे स्वभाव, त्यांचे परस्परांशी असणारे जिव्हाळ्याचे संबंध हे सर्व कुठल्याही देशातल्या व कुठल्याही काळातल्या माणसाच्या स्वभावप्रकृतीशी मिळतेजुळते आहेत. कौटुंबिक सुखदु:खाचे क्षण, अनपेक्षित आपत्ती, निरपेक्ष मदत, नियतीचे चमत्कारिक खेळ, माणुसकीचे दर्शन - हे सारे आपल्या अनुभवविश्वाचे घटक, कुठल्याही थोर कलाकृतीचेही ते अपरिहार्य भाग असतात. त्यामुळे देशकालभाषेच्या सीमारेषा अशा कलाकृती ओलांडून सर्वांना आवाहन करू शकतात.

वडील युद्धावर गेलेले; आर्थिक स्थिती बेतासबात. नाताळ जवळ आलेला. त्यामुळे भेटी द्यायच्या नाहीत असे आई आपल्या चौघां मुलींना सुचवते. त्या खूप उदास होतात. ''भेटी द्यायच्या नाहीत तर तो मग नाताळ कसला?'' असे ज्यो म्हणते. ''गरीब असणं वाईटच.'' मेग म्हणते. ''काहींना खूप वस्तू मिळतात, काहींना काहीच मिळत नाही हा अन्यायच नाही का?'' छोटी ॲमी म्हणते. बेथ सर्वांची समजूत काढते. ''आपल्याला आई आहे, वडील आहेत. आपण साऱ्या बहिणी आहोत ना एकमेकांना?'' - अशा ह्या चार बहिणीतल्या संवादाने कादंबरीचा आरंभ होतो. तो मनाची पकड घेतो - आणि ही पकड शेवटपर्यंत वाचकाला खिळवून ठेवते.

या चौघी बहिणींचे एकमेकींवर प्रेम आहेच; पण प्रत्येकीचे आवडीचे विषय वेगळे. छंद वेगळे. विचार वेगळे. स्वप्ने वेगळी. स्वभाव वेगळे. एकमेकींशी त्या वाद घालतात, भांडतात, रुसतात, फुगतात. ज्यो मुलासारखं वागायचं म्हणून शीळ घालते. तर ॲमी तिला बजावते, ''मला नाही आवडत पुरुषी थाटाच्या मुली.'' ॲमी वयाच्या मानाने अवघड व लांबलचक शब्द वापरण्यात पटाईत. ''चांगले मोठमोठे शब्द वापरून भाषा सुधारावी असे मुळी बाईंनीच सांगितलंय आम्हांला.'' मेग थोरल्या बहिणीचा अधिकार वापरून त्या दोघांचंही भांडण कसं चुकीचं आहे हे सांगू पाहते.

मुलगी म्हणून जन्माला आलो याबद्दल ज्योला वाईट वाटत असते. म्हणून ती मुलासारखं वागत राहते; ज्यो हे मुलाचं नावच ती धारण करते; आणि भाऊ म्हणून इतर बहिणींचा सांभाळ करते. तिला साहित्याची आवड असते. ती लेखन करते.

मार्गरिट ही सर्वात मोठी बहीण. सोळा वर्षांची. गोरीपान. किरमिजी पिंगट केस. नाजूक जिवणी. शुभ्र गोरे हात. शालीन, स्त्रीसुलभ.

ज्यो पंधरा वर्षांची. उंच, कृश, सावळी, निळसर करड्या रंगाचे डोळे. दाट लांब केसांचा घट्ट अंबाडा. गबाळे कपडे, गोंधळाचा चेहऱ्यावर भाव.

एलिझाबेथ तेरा वर्षे वयाची. गोरी गुलाबी, मऊसूत केस. चमकदार डोळे. लाजाळू, भाबडी, भित्रट, शांत, आपल्याच कल्पनाविश्वात रमलेली. आध्यत्मिक, पियानोची आवड.

सर्वात धाकटी ॲमी, वय बारा. रंग गोरा. निळे डोळे, खांद्यापर्यंत रुळणारे कुरळे पिवळे सोनेरी केस. वागणे बोलणे प्रौढ स्त्रीसारखे.

आईला नकळत भेटवस्तू देण्यासाठी त्या चौघी एक नाटक बसवतात. कामावरून परत आल्यावर आई त्यांना पपांचे पत्र दाखवते. शेकोटीजवळ नाटक करून आईला चकित करतात. नाटकात मध्येच गोंधळ होतो. कॉट दुमडून प्रेक्षक चिमटून जातात. यासारखे विनोदी व मजेदार प्रसंगही छान रंगवले आहेत.

या मार्च कुटुंबातील मायलेकींना शेजारी राहणाऱ्या लॉरेन्स कुटुंबाचीही चांगली मदत होते. तरुण लॅरीचे ज्योवर प्रेम असते. पण त्यात अडथळे येतात. तेव्हा लॅरी परगावी जातो. विरहामुळे प्रेमाची ज्योत ज्योमध्ये ताव्र व्हावी असा एक आडाखा त्यामागे असतो.

या सर्व बहिणी आपल्या आवडीचा नवरा मिळावा म्हणून सारख्या जागरूक असतात. एकापाठोपाठ एका प्रेमात पडत असतात. त्या एकमेकींच्या खोड्याहा काढत असतात. परंतु त्यांच्यातील जिव्हाळाही अलोट असतो. जीवन आनंदाने, हसतखेळत जगावे हीच प्रेरणा असते. अडीअडचणीतहा आपली माणुसकी जपतात. त्यांची आई ही केवळ आई नसते; वडिलांचीही जागा ती घेते. एवढेच नव्हे तर ती या बहिणींना देवाचाच अवतार वाटते. ज्योचे प्राध्यापकाशी लग्न होते आणि तिचे घोडे गंगेत न्हाते!

योगायोगांची एक मालिकाच या कादंबरीत आहे. परंतु एकूणच या बहिणींमधील भावबंधांचे खट्याळ-प्रेमळ स्वरूप हे वाचकांना भुरळ घालतात. या कादंबरीचे अनुकरण करण्याचा अनेक लेखकांनी प्रयत्न केला, पण तिची सर कोणाला आली नाही. सव्वाशे वर्षानंतरही तिची लोकप्रियता कमी झालेली नाही. 'हम आपके है कौन' सारख्या चित्रपटातील कौटुंबिक जीवनातले नेहमीचेच प्रसंग जसे मनाला भिडतात, तसे लुइसा अल्कॉटच्या या कादंबरीतील साधे सरळ प्रसंगही मनाचा ठाव घेतात. देशकालाच्या सीमा ओलांडूनही उत्तम कलाकृतीतील मानवी भावभावना सर्वांना आवाहन करू शकतात.

ज्योने बेथला उद्देशून लिहिलेली ही कविता पहा :

प्रिय बेथ,
सुखदु:ख, हर्षविषाद, आशानिराशा,
साऱ्या मानवी भावना जेथे लाटा होऊन फुटतात -



कालनदीच्या त्या किनाऱ्यावर
तुझी शांत, सोशिक, समंजस पावले
त्या अनिवार्य अंतिम क्षणाची वाट बघत
तिष्ठत उभी आहेत.
चिंतांच्या आणि संघर्षाच्या सीमेपार
जाण्यास सज्ज झालेल्या माझ्या लाडके,
ज्या सद्गुणांनी तुझे जीवन सुंदर केले,
ते सारे जाताना मला देऊन जा.
ती सहनशीलता, ती आनंदी वृत्ती
आणि शरीरवेदनेच्या पिंजऱ्यातही
निर्भय राहिलेला तो आत्मा-
सारे मला देऊन जा.
मला देऊन जा ते धैर्य, तो समजूतदार गोडवा,
ती कर्तव्यदक्षता-
ज्यांनी तुझ्या पायाखालच्या वाटेवर
सतत उगवती ठेवली ताजी हिरवीगार हिरवळ
आणि उमलून आली असंख्य चिमुकली फुले
मला देऊन जा तो नि:स्वार्थीपणा, आणि
ते असीम औदार्य,
जे सतत क्षमाशील होते जगाशी,
केवळ प्रेमाखातर,
अशा रीतीने या अंतिम वियोगाच्या क्षणीही
येतच आहोत आपण अधिक जवळ
आणि विरहदु:खाच्या कडवटपणात
भरते आहे काही मधुर, सुंदर
या दु:खाच्या स्पर्शाने विरघळून जाईल
माझा कठोरपणा, आणि जीवनात होईल
अज्ञाताविषयीच्या गाढ श्रद्धेचा उदय !
तू नदीपार जाशील, आणि त्या
पलीकडल्या तीरावर तिष्ठत राहशील माझ्यासाठी
जेव्हा आशा आणि श्रद्धा यांचे संरक्षक देवदूत
माझ्यासाठी धाडून

एके दिवशी मलाही नेशील तू आपल्याकडे
त्या स्वर्गीय सुंदर,
जगापलीकडच्या जगात !

**चौघीजणी, पृष्ठे ५६४, तीनशे रुपये**

## अद्भुतरम्य वातावरणाची जादू पकडणाऱ्या कथा

# मधुमती

**रणजित देसाई**

रसिकराज शौनक, उन्मेष, ताजमहाल, सेवा, बाबली, बकुल, चांदीरा, रसूल, मधुमती आणि प्यारीबाई अशा दहा अद्भुतरम्य कथांचा हा संग्रह. १९५८ साली त्याची प्रथमावृत्ती निघाली. चौथी आवृत्ती नुकतीच मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध झाली आहे. रणजित देसाई यांच्या आरंभीच्या काळातील या कथांमध्ये शृंगार-संगीत-खानदानीपणा आणि कल्पनाचमत्कृती यांचे आकर्षण दिसते. ग्वाल्हेर, काश्मीर, गोवा, आग्रा अशासारखी सौंदर्यपूर्ण स्थळेही त्यांच्या कथांना पार्श्वभूमी पुरवतात. इतिहासाचीही त्यांना ओढ आहे. माणुसकी, उदात्तता, मांगल्य, चांगुलपणा, शब्दाची चाड, लहानमोठेपणाचा सामाजिक संस्कार यांचे त्यांना अप्रूप वाटते.

रत्नांचा व्यापारी रसिकराज शौनक गंधर्वकन्यांच्या संगीताच्या बेहोष मैफलीत सर्वस्व गमावून बसतो. त्याचे नऊ मित्रच काय ते त्याच्याबरोबर उरतात. प्रेयसी गायिका नीरजा ही आजारातून बरी होणार नाही हे लक्षात आल्यावर तो आपल्या मंझिलमध्ये एक मैफल घेऊन आपल्या नऊ मित्रांना प्रत्येकी एकेक रत्न देतो; आणि आपल्या कर्जाची फेड करून घ्या असे सांगतो. दुसऱ्या पेटीतले हिरे दासदासींना वाटून टाकतो. रात्रभर नृत्यगायनाचा धडाका उडवून देतो. पहाटे भैरवी गायला लावतो. 'अकेली मत जाओ सखी रीऽ' आणि तिच्या लकेरीच्या शेवटी चिकाच्या पडद्यामागे असणाऱ्या पुष्पशय्येतल्या दुरडीत हात घालतो. 'स् स्' असा अस्पष्टसा आवाज होतो. आणि शौनक हात बाहेर काढतो. पहाट संपण्यापूर्वीच सर्व खेळ आटोपलेला असतो. नीरजा आणि शौनक या दोघांनाही एकाच चितेवर अग्नी देण्यात येतो. अशा आदर्शवादाचे खानदानी आकर्षण रणजित देसाईंच्या प्रतिभेला अखेरपर्यंत ललकारत राहिले.

काश्मीरमध्ये स्केटिंग करताना रविकांत एका चित्रकार तरुणीची - उमाची बर्फात पडलेली पेटी तिला परत देतो. तिच्याकडे पाहून हात वर करताना तो पडतो. तुझ्याकडे पाहताना मी पडलो असे तो म्हणतो तेव्हा ती त्याला टोमणा मारते, ''तुम्हांला स्केटिंग नीट करता येत नाही...'' ती त्याचे आव्हान स्वीकारून त्याला उत्तम स्केटिंगने चकित करून टाकते. श्रीनगरला गेल्यावरही ती भेटते. रविकान्त एका काश्मीरी स्त्रीला पैसे देऊन तिला फुले देण्यास सांगतो. ''मी इतकी फुलं घेऊन काय करू?'' या प्रश्नाला तो उत्तर देतो, ''काही माणसांना आपल्या सौंदर्याचा गर्व असतो. ही फुलं तो गर्व उतरू शकतात.'' त्यामुळे उमा रागावते. पण तिचा त्याच्यावर जीव जडलेला असतो. रविकांत एका काश्मीरी तरुणीला घेऊन पलंगावर पहुडलेला आहे हे बघून उमा चवताळते. त्या तरुणीला पैसे देऊन बाहेर पाठवते आणि रविकांतला म्हणते, ''इथे येऊन माणुसकीची ही विटंबना करता! फुलाफळांची चव घेता, सृष्टिसौंदर्य उपभोगता; पण तेवढ्यानं तुमचं दरिद्री अंतःकरण तृप्त होत नाही. पैशाच्या जोरावर अशा तऱ्हेने तुमच्या पाशवी वासनाही भागवता... शरीरभोगाशिवाय तुम्हाला सुख मिळत नाहीच का?...'' आणि पुन्हा असा प्रकार इथं करू नका असं त्याला बजावते.. तो तिला तसं वचन देतो व पुढे म्हणतो, ''पण असे सांगून तू माझ्यावर अन्याय करीत नाहीस ना?''

''एवढ्याच गोष्टीत तुमचं सुख सामावलं असेल तर मला हाक मारा. मी येईन.'' असं उमा म्हणते. तेव्हा रविकांत अंतर्मुख होतो, अस्वस्थ होतो. कोकरनागला एका तंबूत ते दोघे एकत्र राहतात... लग्नाबद्दल तो तिला विचारतो. ती त्याचे आवेगाने चुंबन घेते.

'उन्मेष'मधील हे सारे प्रेमातले रुसवेफुगवे उमाच्या मनातला आपल्या साथीदाराच्या शुद्ध चारित्र्याचा आग्रहही व्यक्त करतात.

ताजमहालकडे पौर्णिमेच्या रात्री पाहताना त्याची निर्मिती करणारा इसा हाच ताजमहालची सारी कहाणी सांगतो; आणि शेवटी ''मुसाफिर, जा. पहाट व्हायला आलीय. मला गेलं पाहिजे'' म्हणून निघून जातो. ''तुला ही कहाणी कुणी सांगितली'' असा प्रश्न विचारला जातो; तेव्हा त्या माणसाचे दोन्ही हात थोटे आहेत हे लेखकाच्या लक्षात येते... आणि अंगावर रोमांच उभे राहतात.

अशा कथांची एक मोहिनी पडते. त्यांच्या मायाजालात वाचक अलगदपणे अडकत जातो.

आचार्य अत्रे यांनी म्हटले आहे, ''रणजित देसाईंची लघुकथा सर्वसामान्य मराठी लघुकथेपेक्षा निराळी आहे. अद्भुतरम्य वातावरणात वावरण्याची तिला हौस आहे. निळ्या, सुंदर स्वप्नात ती रंगून गेलेली आहे. वास्तवापेक्षा इतिहास तिला अधिक रुचतो. संगीत व शृंगाराच्या रसात ती नखशिखान्त न्हाऊन निघाली आहे. रसिक मनाची नादिष्ट पात्रे त्यांच्या कथेत

स्वप्नातल्याप्रमाणे वावरत आहेत. कलेसाठी आणि प्रेमासाठी ती आपले जीवन उद्‌ध्वस्त करून घेतात. आणि त्याची मुळीच खंत मानीत नाहीत. त्यांच्या कथातील वातावरण अद्‌भुताकडे झुकणारे असले तरी त्यातून आकाराला येणाऱ्या व्यक्ती मात्र मानवी जगातल्या आहेत. त्यांच्या लेखणीत माधुर्य आहे, प्रसाद आहे. वाचकाला रम्य वातावरणात नेऊन वास्तवता विसरायला लावण्याची जादू आहे.''

**मधुमती, पृष्ठे ११७, साठ रुपये**

---

## परंपरागत भारतीय कलाप्रकाराला आज जगभर भाव

# सुशोभित भरतकला

**विजया रवळगावकर**

भारतीय भरतकला ही प्राचीन काळापासून जगभर नावाजली गेलेली आहे. भारतीय महिलांनी आपल्या घरातील कपडे, बटवे, पडदे, चादरी, उशांचे अभ्रे, रुमाल, दुपट्टा, पोशाख, साड्या यावर विविध शैलीतील कशिदा-भरतकामाद्वारे आपल्या घराच्या सौंदर्यात भर घालण्याचा परिपाठ ठेवला आहे. रेशीम, जर, मोती, टिकल्या यांच्या साहाय्याने साध्या रुमालाचेही एका सौंदर्यपूर्ण कलाकृतीत रूपांतर होते. तो रुमाल हा प्रेमाचे व आपुलकीचे प्रतीक बनून जिवलगाच्या मृदू भावनांना खुणावत, सुखावत राहतो...

भरतकाम ही कला आहे तशीच एक कारागिरीही आहे. सध्या तर भरतकाम केलेले कपडे, शर्ट, साड्या यांना बाजारातही चांगली मागणी आहे; आणि नव्या फॅशनप्रमाणे त्यातही खूप बदल होत आहेत.

भारतीय भरतकामाच्या परंपरागत वैशिष्ट्यांना आधुनिक वळण लाभत आहे; महिलांमध्येही नवनवे प्रयोग करण्याची हौस वाढत आहे. आपल्या भरतकाम केलेल्या, पेंट केलेल्या, कोरीव काम केलेल्या वस्तूंची निर्यात मोठ्या प्रमाणात परदेशातही होत आहे.

विजया रवळगावकर यांचे 'सुशोभित भरतकला' हे पुस्तक भरतकामात रस असणाऱ्या महिलांना अत्यंत उपयुक्त आहे. भरतकामाची सर्वांगीण माहिती त्यात अत्यंत आकर्षक रीतीने देण्यात आली आहे. भारतीय भरतकलेची १२ वैशिष्ट्ये असून त्यात २५ प्रकारच्या टाक्यांचा समावेश होतो अशी माहिती लेखिका देते. या पुस्तकात हाती भरतकाम, मशीन भरतकाम आणि सुशोभित भरतकाम अशा तीन मुख्य वर्गीकरणानुसार माहिती देण्यात आली आहे.



आकर्षक मांडणी, एकसारखे टाके, सुंदर व आकर्षक डिझाईन आणि चोखंदळ रंगसंगती या चार गोष्टींकडे व्यवस्थित लक्ष दिले तर आपण केलेले भरतकाम हे कलाकृतीच्या पातळीवर पोचू शकते.

'हाती भरतकाम' या विभागात ड्राइंगसाठी लागणारे साहित्य (पेन्सिल, रबर, पट्टी, स्क्वेअर, कंपास, कार्बन-ट्रेसिंग पेपर, नीळ, खडू पावडर, ट्रेसिंग व्हील इ.), भरतकाम करताना लागणारे साहित्य (रिंग, चौकट, स्टँड, सुया, कात्र्या, रेशीम धागे, सुती दागे, जीग, सलमा, कंकरी, बादला) यांची माहिती प्रथम दिली आहे. सुती व रेशीम कापडाचे प्रकार, डिझाईन छापण्याच्या पद्धती यांवर प्रकाश टाकला आहे. 'रंगसंगती' हे प्रकरण तर अत्यंत मूलभूत कानमंत्र देणारे आहे. रंगाचे गुण लक्षात घेऊन व डिझाईनचा योग्य वापर करून, व्यक्तीचा बांधा, वय, वर्ण, प्रसंग यांचे भान ठेवून केलेले भरतकाम त्या व्यक्तीचे आकर्षकपण वाढवू शकते हेही स्पष्ट केले आहे. डिझाईन चांगले होण्यासाठी चित्रकलेचे ज्ञानही उपयुक्त ठरते.

हाती भरतकामासाठी वेगवेगळे टाके वापरता येतात. उलटी टीप, साखळीचा टाका, पिळ्याचा टाका, जाळीचा टाका, पिसाचा टाका, काजाचा टाका, कांबळाचा टाका, गव्हाचा टाका, काश्मिरी स्टिच, माशाच्या हाडाचा टाका, गाठीचा टाका, डोळ्याचा टाका, ॲप्लिक वर्क, आरशाचे (अबला) काम, लांब व आखूड टाका, क्रुएल स्टिच, डॉन थ्रेड वर्क, फुलीचा टाका, फुलकारी, रिचेल्यू वर्क, शॅडो वर्क, पॅचवर्क, अरीवर्क, बंगाली टाका, गाठीच्या पिसाचा टाका अशा ३० टाक्यांची त्यांच्या उपप्रकारांसह नोंद या पुस्तकात घेतली गेली आहे. माणूस हा वेगवेगळ्या प्रकारे निसर्गाचे अनुकरण करतो हेही त्यावरून ध्यानात येते.

पंजाबची फुलकारी, लखनौची चिकनकारी, कच्छचे कबनी काम, बंगालची कंथा (शॅडो वर्क), त्रावणकोरचे लेसवर्क, कर्नाटकातील कशिदा, काश्मीरचा कशिदा इ. प्रादेशिक भारतीय वैशिष्ट्यांचीही दखल घेण्यात आली आहे.

शिवणयंत्रावरही भरतकाम करता येते. मशीनमध्ये त्यासाठी बदल कसा करून घ्यावा, मशीनची काळजी कशी घ्यावी, मशीनमध्ये होणारे बिघाड - याचीही विस्तृत चर्चा करून मशीनवरील टाक्यांच्या विविधतेचे व वैशिष्ट्यांचे स्वरूप उलगडून दाखवले आहे. रनिंग स्टिच, सॅटिन स्टिच, विव्हिंग, कॉर्डिंग, आयलेट, मिक्सिंग, कटवर्क, पॅचवर्क, राऊंड स्टिच, पिनवर्क, व्हेनिशियन एम्ब्रॉयडरी, बिडवर्क, स्कॅलॉप (अर्धचंद्राकृती - कमानीचे भरतकाम) अशा पद्धतींचा गरजेनुसार वापर करता येतो.

शटल वर्क, क्रोचेट वर्क (क्रोशा) यांच्या उपयोगाने गोल रुमाल, ट्रे क्लॉथ, पर्सेस,

बटवे, नीडलकेस, हँडबॅग्ज, पिनकुशन्स, सॉफ्ट टॉइज, टीकोझी वगैरे वस्तूंना कलात्मक रूप देता येते.

लोकरीचे विणकाम या प्रकारात लोकरीचे प्रकार, सुया, टाक्यांच्या पद्धती, यांची माहिती देऊन पायमोजे, गोंडे, गवळी टोपी, बॉनेट, स्वेटर, ब्लॉउज, विदूषक वगैरे बनवण्याच्या कृतीही विस्तारपूर्वक सांगितला आहेत. नायलॉन वायरनेही बऱ्याच कलावस्तू तयार करता येतात.

महाराष्ट्र सरकारच्या तांत्रिक परीक्षामंडळाकडून दरवर्षी शिवण-भरतकाम या विषयाची जी परीक्षा घेण्यात येते तिच्यात विचारले जाणारे प्रश्न देऊन त्यांची उत्तरे कशी द्यावी याबद्दलही मार्गदर्शन करण्यात आले आहे. भरपूर आकृत्या देऊन सर्व संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. रंगीत आठ पृष्ठांमध्ये आकर्षक नमुने देण्यात आले आहेत. त्यामुळे हौशी, परीक्षार्थी व व्यावसायिक अशा सर्वच वाचकांच्या गरजा हे पुस्तक उत्तम प्रकारे भागवू शकेल.

**सुशोभित भरतकला, पृष्ठे ड.क्राउन १४०+८+८, दीडशे रुपये**

---

## खुशवंतसिंग यांच्या ठेवणीतल्या चीजांचा खजिना

# सेक्स, स्कॉच अँड स्कॉलरशिप

**अनु. अनिल किणीकर**

खुशवंतसिंग यांच्या सेक्स, स्कॉच अँड स्कॉलरशिप या पुस्तकाचे स्वरूप असे आहे की कुठलेही पान उघडावे आणि वाचू लागावे. त्यात वाचक एकदम गुरफटून जातो आणि पुढे वाचतच राहतो. तशातच हे पुस्तक म्हणजे एका परीने 'निवडक खुशवंतसिंग' अशा स्वरूपाचे आहे. त्यात स्वत:च्या पूर्वजीवनाबद्दलचे त्यांचे प्रदीर्घ निवेदन आहे. (५० पृष्ठे) तीन स्वतंत्र लेखांत भारतीय जीवनातील कामसूत्र, भारतीय जीवनातील विनोद आणि भारतातील गरीबी यावरचे 'प्रांजल' भाष्य आहे. ग्यानी झैलसिंग, एम हिदायतुल्ला, बलवंत गार्गी वगैरे व्यक्तींचे खोडसाळ किंवा परखड परिचय आहेत. लोकसभेतील खासदारकीचे दिवस आणि खलिस्तान या निमित्ताने राजकारण आले आहे. ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, कलकत्ता, दक्षिण भारत यातील प्रवासाची वर्णने आहेत. गुरू नानक यांच्या निमित्ताने धार्मिक चिंतन आले आहे.



ललित लेखनाचेही काही उतारे आहेत. उमराव जान अदाच्या कथेचा अनुवाद आहे. थोडक्यात सांगायचे तर खुशवंतसिंग यांनी लेखन-चिंतन क्षेत्रात केलेल्या भ्रमंतीतले काही वेचक नमुने या पुस्तकात आले आहेत; आणि त्यातील पानापानाला खास खुशवंतसिंग स्पर्श आहे. त्यांचा बिंधासपणा शब्दाशब्दात जाणवतो.

''लंडनमध्ये शरीरसंबंधाचा माझा पहिलावहिला अनुभव जणू माझी वाटच पाहत होता. मॉडर्न स्कूलमधल्या बाईचं मी एक उत्कट चुंबन घेतलं. त्यांनी मला त्यावेळी समज दिली. पण त्या प्रसंगानंतर... लंडनमध्ये हॉटेलात दाराला कडी लावून आम्ही दोघे एकमेकांची बेभानपणे चुंबने घेत गादीवर अक्षरश: गडाबडा लोळू लागलो. आता मी अधिक धीट झालो...माझी उत्थापित अवस्था पाहून हळूच एक लाडिक चापटी मारून बाई म्हणाल्या, ''प्लीज... नको...'' परंतु त्या बोलण्याचा माझ्यावर परिणाम झाला नाही. मी त्यांचा ब्लाऊज आणि साडी फेडली... अठराव्या वर्षीचा हा अनुभव...''

खुशवंतसिंग यांची प्रतिमा 'बडबड्या, आक्रमक, दारूड्या बाईबाज सरदारजीची असल्याची' माहिती शाळेत एक शिक्षिका देतात; आणि त्या वर्गात असणारी खुशवंतसिंगांची सोळा वर्षांची नात घरी येऊन सरळ आपल्या या आजोबांना विचारते, ''नाना, तुम्ही खरंच बाईबाज आहात का?'' त्यावेळी खुशवंतसिंगांची बायको आणि कन्या याही तेथे मौजूद असतात. अशा प्रसंगांची गंमत रंगवून सांगण्यात खुशवंतसिंगांची हुशारी चांगलीच प्रत्ययाला येते. आपली प्रतिमा पक्का दारूड्या आणि स्त्रीलंपट अशी आहे याला मुख्यत: आपणच जबाबदार आहो; पण ते काही खरं म्हणजे आपलं व्यक्तिमत्त्व नाही असेही ते सांगतात. आपल्या आयुष्यात स्त्रिया आल्या; पण त्यांच्याबाबत कधी आपण फाजील स्वातंत्र्य घेतलं नाही, किंवा कधी त्यामुळं कुणाकडून थोबाडीत खाल्ली नाही, दारू पितो-रोज पितो पण कधीही झिंगून कुठं पडलो नाही असेही स्पष्ट करतात. ''पोहण्याचे तलाव भरतील, एवढी दारू मी प्यायलो आहे. डझनावारी सुंदर स्त्रियांचा सहवास मला मिळालाय. आजही सुंदर मुलींच्या घोळक्यातच मी असतो.'' सांगायचा मतलब हा की, खुशवंतसिंगांचे लेखन म्हणजे असा बिंधास मालमसाला, चटकमटक.

लेखन करायचे म्हणून लंडनमधील भारतीय उच्चायुक्त कार्यालयातील नोकरी त्यांनी सोडली. युनेस्कोचे, आकाशवाणीचे त्यागपत्र दिले. संपादकपद सोडले. सहा वर्षे राज्यसभेचे सदस्य म्हणून काढले. सरकारविरुद्ध टीका केली; मतदानही केले. आज ७७/७८ वय असून नावावर साठेक पुस्तकं आहेत. देशातील सर्वाधिक पगार मिळवणारा संपादक म्हणून त्यांचा दबदबा आहे. त्यांच्या स्तंभलेखनातूनही त्यांना चांगली कमाई होते. सध्या ते आत्मचरित्र लिहित आहेत.

खुशवंतसिंग यांना पाकिस्तानमधील एका कॉलेजच्या मुलींसमोर भाषण करण्याचे निमंत्रण आले. त्यांनी ते स्वीकारले. त्या सनातनी, बुरखाधारी कॉलेजच्या मुलींना खुशवंतसिंगांनी

सांगितले, "मी इथं आलो. कारण सादिमा दहलवीनं सांगून ठेवलंय - की मी स्त्री असतो तर कायम गरोदरच राहिलो असतो. कारण मला नाही म्हणणं जमत नाही! (मुलींमध्ये हास्यकल्लोळ) माझी इच्छा आहे की तुमच्या सुंदर प्राचार्या नकार देण्याबाबत संकोची स्वभावाच्या असत्या तर त्याचा परिणाम अधिक फलदायी झाला असता (पुन्हा हशा)" सनातनी वातावरण असलेल्या कॉलेजमध्ये त्यांनी असे पाखंडी विचार त्यांनी मांडले. या भाषणावर त्यांचा मित्र म्हणाला, "तू खून करून सहीसलामत सुटलास."

"बंगलोर नाव कसे पडले ? बंगलुरिया म्हणजे किंचित भाजलेले हरभरे. केम्पे-गौडाने हे गाव जिंकल्यावर, त्याला हे हरभरे खायला मिळावे. म्हणून ते नावच त्या गावाला त्याने देऊन टाकले." या सारखी माहितीही खुशवंतसिंग सहजपणे सांगतात.

बंगलोरमधील प्रेक्षणीय वस्तूंची यादी देताना ते मिस्किलपणे म्हणतात : "विमानं, टेलिफोन्स, घड्याळं, इलेक्ट्रॉनिक उपकरणं, मँगोटिन्स, अॅवोकेडो पीअर्सची फळं आणि गुडघ्यापर्यंत केस असणाऱ्या हेशबोनच्या सरोवरासारख्या काळ्याभोर डोळ्यांच्या 'पतली कमर' वाल्या सुंदर मुली!"

रात्री पॉवरकटमुळे दिल्लीतली एक रात्र कशी गेली हे सांगताना खुशवतसिंग लिहितात, "पॉवर कट. दिवे नाहीत. पंखे नाहीत. ती रात्र मी बागेतल्या हिरवळीवर खुर्ची टाकून हातानं डासांना मारत आणि आकाशातल्या तारकांची मोजदाद करीत घालवली." तरीही दिल्लीला परतण्याची उत्सुकता असतेच. कशी? "इतर शहरातल्या वारांगनांबरोबर भरपूर मजा करून प्रेयसीकडे जाणाऱ्या माणसाप्रमाणे मी नेहमी दिल्लीला परततो."रवींद्रनातांचे ते अवतरण देतात. त्यांच्या बागेतल्या झाडावरच्या उंच फांदीवर शामा पक्षी गात असतो. त्याबद्दल ते म्हणतात :

आमोन देशी कोथाओ खोजाय
पाबे तो को तुमी
शोकोल देशेर रानी शेजेय
आमार जोन्मो भूमी

सगळीकडे शोधलंत तरी या देशाइतका सुंदर देश पृथ्वीवर सापडणार नाही. सगळ्या देशात माझी जन्मभूमी एखाद्या राणीसारखी शोभते."

...अशा रसिकतेची जोड बिंधासपणाला मिळाल्याने खुशवंतसिंगांची ओळ न ओळ मनाला भिडते.

**सेक्स, स्कॉच अँड स्कॉलरशिप, पृष्ठे २२४, सव्वाशे रुपये**



**स्वतःच्या आरोग्यरक्षणाचे प्रत्येकाजवळ असलेले अमोघ साधन**

# एकच पेला शिवाम्बूचा

**डॉ. शशि पाटील**

डॉ. शशि पाटील (जन्म - १९४५) हे गेली पंचवीस वर्षे शिवाम्बू योग व निसर्गोपचार केंद्र चालवत आहेत. देहशुद्धीसाठी शिवाम्बू उपचार व मन:शुद्धीसाठी विपश्यना, ध्यानप्रक्रिया या गोष्टी अत्यंत उपयुक्त आहेत असा त्यांचा विश्वास आहे. शिवाम्बू म्हणजे स्वमूत्र. त्याच्या प्राशनाने दुर्धर व्याधीतूनही मुक्तता होते हे शेकडो रुग्णांच्या संदर्भात त्यांना आढळून आले आहे; आणि या स्वस्त सुलभ उपचार पद्धतीचा प्रचार करण्यासाठी त्यांनी 'एकच पेला शिवाम्बूचा' हे चार अंकी नाटक लिहिले आहे. नाटकात फारशा घटना नाहीत. केवळ चर्चा आहे. संवादाच्या रूपात माहिती दिली आहे.

शिवाम्बू चिकित्सक अनुभवी डॉक्टरांना युवाशक्तीचा प्रतिनिधी कार्यकर्ता योगेश हा दुर्धर रोगाने मरणासक्त झालेल्या अंबूताईंवर उपचार करण्यासाठी बोलावतो. या घटनेपासून या नाटकाचा प्रारंभ होतो. अंबूताईंचे पती चिंतोपंत, मुलगा अविनाश, अविनाशची पत्नी श्रद्धा, शेजारी नाना ही अन्य पात्रे.

शिवाम्बूबद्दलची माहिती वेगवेगळ्या रोगांच्या संदर्भात देण्यात येते. मधुमेह, मूत्रपिंडाचे विकार, कर्करोग, मधुचंद्रदाह, आम्लपित्त, दंतरोग, ल्यूकेमिया, जिभेचा कर्करोग, बद्धकोष्ठता, रक्तदाब, हृदयविकार, एडस्, अशा अनेक विकारांमध्ये शिवाम्बूसेवन कसे प्रभावी ठरते हे उदाहरणे देऊन सांगितले आहे. शिवाम्बूचा इतिहास, वेगवेगळ्या देशात होणारा वापर, शिवाम्बूचे घटक, योग्य आहार व निसर्गोपचार, शिवाम्बू घेण्याची पद्धत, प्रमाण, शिवाम्बूचा मसाज इ. अनेक तपशीलही संभाषणाच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आले आहेत. शिवाम्बू सेवनाने वार्धक्यही जाणवत नाही; शरीर चैतन्यपूर्ण व तरतरीत राहते. याची पुन:पुन्हा जाणीव देण्याचा कळकळीचा प्रयत्न या संवादात्मक कृतीत केला आहे.

मोरारजी देसाई, पी. बी. पाटील, विनोबा भावे, बाळकोबा भावे, रावजीभाई पटेल, वैद्यराज भोगे वगैरेंची मते शेवटी दिली आहेत. मलावरोध हे सर्व रोगांचे आदिकारण आहे;

पांढरपेशा वर्गातील ७०/८० टक्के लोक मलावरोधामुळे देहक्लेश भोगत असतात. आपली जीवनप्रणालीही आपल्या आरोग्याला बाधक अशी आहे याकडेही लक्ष वेधणारी टिपणे दिली आहेत. विविध रोगांमध्ये शिवाम्बूचा जो उपयोग होतो त्यावरून शिवाम्बू उपचारप्रणाली कशी गुणकारी आहे, याची यादीही दिली आहेत. शिवाम्बूचे सेवन पतिपत्नी दोघांनी केले तर निपुत्रिकांना ४/६ महिन्यात फलधारणा होऊ शकते, सीझेरियन वा फोर्सेपची पूर्वपीठिका असणाऱ्या गर्भवती महिलांची नैसर्गिकरीत्या प्रसूती होते, एपिलेप्सीचा बंदोबस्त होतो, बाल व वृद्ध यांना एकाच प्रकारचे उपचार लागू पडतात, असेही डॉ. पाटील यांचे प्रतिपादन आहे.

एका अभिनव उपचार पद्धतीबद्दल मनात असणाऱ्या सर्व शंका कुशंका दूर करणारे हे पुस्तक आहे.

शिवाम्बूच्या महतीबद्दलचे काही संस्कृत श्लोकही येथे द्यावेसे वाटतात.

शिवाम्बु चामृतं दिव्यं जरारोगविनाशनम्
तदादाय महायोगी कुर्यात् वै निजसाधनम् ।।९।।

(शिवाम्बू हे दिव्य अमृत आहे. वार्धक्य, रोग यांचा नाश करणारे आहे. महायोग्यांनी याचे प्राशन करून आपली साधना करावी.)

मुखशुद्धिं विधायाथ कृत्वा चावश्यकीं क्रियाम्
पिबेत् शिवाम्बु विमलं जन्मरोगविनाशनम् ।।१०।।

(उठल्यावर मुखशुद्धी इ. क्रिया कराव्या. नंतर मलरहित शिवाम्बूचे सेवन करावे. जन्मापासूनचे रोग नाश पावतात.)

मन:शिला यस्तु योगीं चूर्णितान्तु शिवाम्बुके
विलेपनादरोग: स्यादंगे कृष्ण शिरोरुह: ।।४३।।

(मन:शिलाचे चूर्ण करून शिवाम्बूमधून त्याचा सर्वांगाला लेप लावल्याने योगी रोगमुक्त होतो तसेच त्याचे मस्तकावरचे केस काळेभोर होतात.)

निंबस्य पत्रजरसं तन्मिश्रंच शिवाम्बुना
य: सेवने योगयुक्तो स भवेदमरोपम: ।।३२।।

(निंबाच्या पानांचा रस शिवाम्बूमध्ये घालून सेवन केल्यास योगी, साधक मनुष्य देवाप्रमाणे कांतिमान होतो.)

सर्वोपद्रवनिर्मुक्त: सदाशिववपुर्धर
ब्रम्हाण्डगोलके क्रीडन् देववत् मोदतो चिरम् ।।३१।।

(पथ्यपूर्ण शिवाम्बू सेवनाने माणूस सर्व उपद्रवांपासून मुक्त राहून शंकरासारखे तेजस्वी शरीर प्राप्त करतो; ब्रम्हांडात क्रीडा करीत देवांप्रमाणे सदैव आनंदी राहतो.)

**एकच पेला शिवाम्बूचा, पृष्ठे २२४, सव्वाशे रुपये**



**माणसाच्या मेंदूमध्ये इलेक्ट्रोड बसवून हिंसक प्रवृत्ती रोखता येईल का?**

# द टर्मिनल मॅन

**अनु. डॉ. अरुण मांडे**

ज्युरासिक पार्कचा लेखक-दिग्दर्शक म्हणून मायकेल क्रिश्टन याचे नाव बहुसंख्य वाचक-प्रेक्षकांना परिचित आहे. त्याने अनेक बेस्टसेलर थ्रिलर्स-थरारकथा लिहिल्या आहेत. त्याच्या 'द टर्मिनल मॅन' या थरारकथेचा अनुवाद डॉ. अरुण मांडे यांनी केलेला आहे.

लॉस एंजेलिसमधील युनिव्हर्सिटी हॉस्पिटलमध्ये प्रमुख डॉ. मॅकफरसन हे संगणकाद्वारे रोगाचे निदान, शस्त्रक्रियाविषयक तंत्रज्ञानात सुधार व सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानातील नवे संशोधन या दृष्टीने प्रयोग करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आखतात. डॉ. मॉरिस व डॉ. एलिस हे न्यूरोसर्जन माकडांवर प्रयोग करून, मेंदूवर शस्त्रक्रिया करून व्यक्तिमत्त्वाचे विघटन दुरुस्त करण्याचा प्रयत्न करत असतात. कॉम्प्युटरद्वारे कृत्रिम स्टिम्युलेशन झटके देऊन, त्यांच्या सुखद संवेदना देऊन हिंसाचार रोखणे शक्य आहे असे डॉक्टरांना वाटते.

हाच प्रयोग माणसावर करण्याची त्यांची इच्छा असते. त्याला योग्य असा हिंसक प्रवृत्तीचा माणूस त्यांना हवा असतो.

हॅरॉल्ड फ्रँकलिन बेन्सन, वय ३४, घटस्फोटित. हा कॉंप्युटर शास्त्रज्ञ - या शस्त्रक्रियेसाठी त्यांना योग्य वाटतो. हायवेवरचा एका अपघातात त्याला मार बसतो. सहा महिन्यांनी त्याला अधूनमधून ब्लॅकआउट झाल्यासारखे वाटते. मद्यप्राशन केल्यावर एक प्रकारचा उग्र दर्प वातावरणात येतोय असे त्याला वाटते, आणि तो हिंस्र बनून कोणाशीही मारामारी करतो. शुद्धीवर आल्यावर आपण अनोळखी ठिकाणी आहो, आपले कपडे फाटलेले आहेत, आपल्या अंगावर मारामारीच्या खुणा आहेत, अंग ठणकत आहे असे त्याला आढळून येई. मात्र मधल्या काळात नेमके काय झाले हे त्याला आठवत नसे. पोलिस त्याला पकडतात, परंतु त्यानेच मारामाऱ्या केल्या हे सिद्ध करू शकत नाहीत. तशातच बेन्सन यांत्रिक बुद्धिमत्ता, कृत्रिम सजीवता या क्षेत्रात संशोधन करत असतो. यंत्रे माणसाशी स्पर्धा करताहेत, जगभर यंत्रांचे साम्राज्य येणार आहे, यंत्रे जगावर राज्य करण्याचा कट करीत आहेत असा शोध लावल्याचे तो जाहीर करतो.

त्याला मानसोपचार तज्ज्ञ तपासतात. सायकोमोटर एपिलेप्सीचे हे झटके आल्यावर तो हिंस्त्र बनतो असे निदान करतात. ड्रग रेझिस्टंट स्टेजचा तो पेशंट आहे असे म्हणतात.

पोलिस त्याला एका खुनाच्या केसमध्ये पकडतात; आणि या हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यासाठी त्याला दाखल करतात. आपल्या प्रयोगासाठी ही अत्यंत उपयुक्त केस आहे, त्यामुळे आपल्या हॉस्पिटलचे नाव सर्वत्र गाजेल अशी तेथील प्रमुख डॉक्टरांची भावना असते.

मनोविकारतज्ज्ञ डॉ. जेनेट रॉस हिला मात्र अशी शस्त्रक्रिया करणे अनुचित वाटते. आपला विरोध ती शेवटच्या क्षणापर्यंत नोंदवत राहते. कॉम्प्युटरच्या सहाय्याने त्याच्या मेंदूला झटके देऊन स्टिम्युलेट करण्याचा हा प्रयोग हिंसक वर्तन थांबवण्याऐवजी अधिक अनर्थकारक व घातक ठरू शकेल, असे तिला वाटत असते. पण इतर डॉक्टरांपुढे तिचे काही चालत नाही. हॉस्पिटलमध्ये प्रथम या शस्त्रक्रियेची सर्व डॉक्टरांपुढे चर्चा केली जाते. बेन्सनलाही सर्वांपुढे हजर केले जाते.

खुद्द बेन्सनलाही या शस्त्रक्रियेबद्दल कुतूहल असते. ती व्हावी, तिच्यामुळे आपण बरे होऊ असे त्याला वाटत असते. त्याच्या मानेखाली पाठीवर कातडीखाली एक रुपायाच्या नाण्याएवढा छोटा कॉम्प्युटर बसवला जातो. तो कॉम्प्युटर हॉस्पिटलच्या मुख्य कॉम्प्युटरशी जोडलेला असतो. ठराविक वेळा त्याला स्टिम्युलेट करण्याचा प्रोग्रॅम त्यात भरलेला असतो. या स्टिम्युलेशनमुळे बेन्सनच्या हालचालीत होणारा फरक नोंदवण्याची व्यवस्था केलेली असते. बेन्सनची एक मैत्रीण अँजेला ब्लॅक ही येऊन आवश्यक त्या वस्तू देऊन जाते.

दिनांक ९ मार्च १९७१ रोजी बेन्सनला हॉस्पिटलमध्ये दाखल केले जाते. दहा मार्चला शस्त्रक्रिया होते. कवटीच्या उजव्या भागावर भोक पाडून स्टिरिओ स्टॅटिक फ्रेम पेशंटला बसवली जाते. त्या उपकरणाची जागा कॉम्प्युटर प्रिंटआऊटवरून निश्चित केली जाते. कोऑर्डिनेटस चेक केली जातात. मॅच्ड विदिन एस्टॅब्लिश्ड लिमिटस असा संदेश येतो. कवटीबाहेर आलेल्या वीस तारा सोडवून घेतल्या जातात. बेन्सनच्या शरीरात ॲटॉमिक पेसमेकर बसवला जातो. त्यावर एक टेलिफोन नंबरही दिलेला असतो. ''माझ्या शरीरात ॲटॉमिक पेसमेकर आहे. मला मृत्यूनंतर जाळले तर किरणोत्सर्ग होईल. तो धोका टाळण्यासाठी २१३ - ६५२११३४ या नंबरशी संपर्क साधा'' असा संदेश ठराविक वेळाने त्यातून दिला जात असतो. एक तास बारा मिनिटात सर्व शस्त्रक्रिया पूर्ण होते. ऑपरेशननंतर बेन्सनला विशिष्ट औषधे देण्याच्या सूचना मिळतात. संध्याकाळी मुख्य डॉक्टर मॅकफर्सनही बेन्सनला भेट देऊन चौकशी करतात. ''मी थकलोय. मी एक टाइम बॉंब आहे - माझा स्फोट कधी होईल अशी सर्वांना काळजी वाटतेय - मी गोंधळात पडलोय... पुढचं युद्ध माणूस आणि मशीन यात होणार आहे. मानवी मेंदू लुप्त होणार आहे'' असे बेन्सन त्या तंद्रीत बडबडत असतो.

११ मार्च रोजी त्याच्या डोक्यातील प्रत्येक इलेक्ट्रोडला उत्तेजना देऊन काय होते याचा अंदाज घेतला जातो. इलेक्ट्रोड वन स्टिम्युलेट केल्यावर सँडविच खाल्ल्यासारखे छान वाटते.



इलेक्ट्रोड दोनमुळे बाथरूमला जाण्याची इच्छा होते. तीनने पुसट आठवणी जाग्या होतात. चारने लहान मुलासारखा तो दूध व बिस्किटे मागतो. तीन चाकी सायकल मागतो. पाचने सँड पेपरने घासल्यासारखे विचित्र, चीड आल्यासारखे वाटते. हा संभाव्य झटका दाखवणारा इलेक्ट्रोड असतो. इलेक्ट्रोड सहाने लैंगिक भावना उत्तेजित होतात. असे चाळीस इलेक्ट्रोडचे वेगवेगळे परिणाम टिपले जातात. त्या चाळीसपैकी सात, नऊ, एकतीस हे इलेक्ट्रोडस पॉझिटिव्ह तर पाच आणि बत्तीस निगेटिव्ह आढळतात. पॉझिटिव्ह इलेक्ट्रोडमुळे लैंगिक भावना जाग्या होतात. सारखं स्टिम्युलेशन मिळत असल्याने त्याचा ग्राफ काढण्यात येतो. बेन्सनच्या मेंदूत सकारात्मक प्रतिक्रियांचं आवर्तन तयार होत जाते. डॉ. जेनट रॉस व डॉ. गेरहार्ड हे कॉम्प्युटरवरून येणाऱ्या रिपोर्टची नोंद घेत असतानाच, रिपोर्ट येणे एकाएकी थांबते.

डॉ. जेनेट बेन्सनच्या खोलीत जाऊन काय झालेय ते पहायला निघते... आणि त्यांना तो गायब झालेला दिसतो. कॉटवर उशा व प्लॅस्टिकच्या पिशव्या -

-एकच धावपळ उडते. सर्व डॉक्टर्सना निरोप जातो. सकाळी सहापासून इलेक्ट्रोडचे स्टिम्युलेशन सुरू होईल, त्याआधी बेन्सनला हॉस्पिटलमध्ये आणायला हवे - तरच त्यावर नियंत्रण राहू शकेल. अन्यथा तो हिंसक बनून वाटेल ते करील या भीतीने सारेजण भयभीत होतात. बेन्सनला भेटायला आलेल्या सुंदर तरुणीच्या - अँजेला ब्लॅकच्या फ्लॅटवर डॉ. जेनेट जाते; तर तिला तेथे ती रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसते. आधी समागम करून नंतर तिच्या पोटात स्क्रूड्रायव्हर खुपसून खून केलेला असतो. पोलिसांना डॉ. जेनेट फोन करते. पोलिस अधिकारी कॅप्टन अँडर्स तेथे येतो. त्याला बेन्सनची केस समजावून सांगते. ती घरी येते; अँडर्सही तिच्या घरी लगेच येतो असे म्हणतो. ती घरी येऊन स्नान करते, तेवढ्यात बेल वाजते. अँडर्स आला असावा असे समजून ती दार उघडते; तर समोर येतो बेन्सन. त्याच्या शरीरातील इलेक्ट्रोडच्या स्टिम्युलेशनप्रमाणे क्षणाक्षणात त्याचे वागणे बदलते. कधी प्रेमळ, कधी हिंसक, आक्रमक. तो तिच्यावर हल्ला चढवू पाहतो. मला तुम्ही मशीन बनवू पहात आहात असा आरोप करतो. ती प्रतिकाराचा प्रयत्न करते. किचनमध्ये शिरते. तोही मागोमाग येतो. तिचा गळा दाबतो. ती काहातरी प्रेरणेने मायक्रोओव्हन चालू करते; आणि बेन्सन एकदम किंचाळी फोडतो. डोकं गच्च दाबून अंगाला आळोखेपिळोखे देतो. ती पोलिसांना फोन करते आणि तिची शुद्ध हरपते...

तिला जाग येते तेव्हा कॅप्टन अँडर्स तेथे असतो. मायक्रोवेव्हमुळे बेन्सनच्या इलेक्ट्रॉनिक यंत्रणेत गोंधळ उडाला असावा असे तिला वाटते. पुन्हा बेन्सनचा शोध सुरू होतो. एका विमानतळाच्या हॅंगरमध्ये काम करणाऱ्या मित्राबरोबर तो बारमध्ये गेल्याचे कळते. तेथून हॅंगरमध्ये तो मित्रही मेलेला सापडतो.

आश्चर्य म्हणजे हॉस्पिटलमध्ये बेन्सनचा फोन येतो. मध्येच तो तुटतो. हा फोन कोठून आला याचा शोध घेतला जातो; आणि तो त्याच हॉस्पिटलमधून आलेला आहे असे स्पष्ट होते. म्हणजे बेन्सन त्या हॉस्पिटलमध्येच आला आहे तर ! ...शेवटी तो सापडतो. पण त्या आधी

बराच गोंधळ त्याने उडवून दिलेला असतो.

- तरीही त्याच्यावर आणखी शस्त्रक्रिया करून त्याला बरं करण्याचा जेनेट आणि इतर डॉक्टरांचा विचार असतो. ''सगळं ठीक होणार आहे, हॅरी'' जेनेट त्याला सांगते. ''तू चांगला होणार आहेस.'' पण तरीही तो तिच्यावर चाल करून झेपावू पाहतो.

....मायकेल क्रिश्टनने अवघ्या पाच दिवसातले हे नाट्य क्षणाक्षणाला रंगत वाढावी अशा प्रकारे रंगवले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील अनेक तपशील योग्य प्रकारे दिले आहेत; कॉंप्युटरच्या वापराचेही उत्तम आकलन दाखवले आहे. विज्ञानातील एखादी संकल्पना प्रत्यक्षात नैतिक, मानवी, वैद्यकीय, राजकीय व गुन्हाविषयक विविध आव्हाने कशा प्रकारे उभी करू शकेल याची भिन्नविभिन्न परिमाणेही कथानकाच्या उभारणीत योग्य प्रकारे दाखवली आहेत. १९७१ मधील या घटना आहेत; त्या वर्षाशी सुसंगत असेच तपशील वापरलेले आहेत. त्यामुळे या कथावस्तूची आवाहकता वाढलेली आहे. बेन्सनवरच्या प्रयोगाने तो काही पूर्ण बरा होत नाही. हॉस्पिटलमधील वातावरण, डॉक्टरांची एकमेकांमधील स्पर्धा, प्रत्येक डॉक्टरचे स्वत:चे व्यक्तिमत्त्व व गुणदोष, हे सर्व उत्कंठा वाढावी अशा शैलीत दिलेले आहेत. अँजेला ब्लॅकचे डेथ सर्टिफिकेट, बेन्सनच्या मेंदूचा व प्रतिसादांचा ग्राफ वगैरे देऊन कथावस्तूची विश्वासार्हता वाढवली आहे.

पाश्चात्य लेखक एखाद्या विषयाचा बारकाईने अभ्यास करून लिहितात. बेन्सनच्या खांद्याजवळ बसवलेल्या चकतीएवढ्या संगणकाचे काम मायक्रोओव्हन सुरू केल्याबरोबर बिघडते - यासारख्या कल्पनांचा वापर या कथेच्या वैज्ञानिक वास्तवाला बळ देतो. वाचकांना खिळवून ठेवण्याची जबरदस्त ताकद या थरारकथेत आहे.

**द टर्मिनल मॅन, पृष्ठे २०७, एकशेवीस रुपये**



**व्हिएतनाम युद्धातील एका पराक्रमाची कहाणी**

# एकदाच अशी रात्र येते

**अनु. रॉय किणीकर**

'आउटपोस्ट ऑफ फ्रीडम' या कॅप्टन रॉजर डॉनलॉन यांच्या आत्मकथनाचे 'एकदाच अशी रात्र येते' हे मराठीकरण रॉय किणीकर यांनी केलेले होते. व्हिएतकॉंगने व्हिएतनामच्या नाम डॉंग या लष्करी तळावर ६ जुलै १९६४ रोजी भयानक हल्ला केला. तेव्हा कॅप्टन रॉजर एच. सी. डॉनलॉन याने प्राणपणाने त्याचा प्रतिकार केला. शत्रूची फळी फोडून त्याला पळवून लावले. पाच तासांच्या घनघोर लढाईत स्फोटक शस्त्रांचा प्रचंड मारा होत असतानाही डॉनलॉनने कॅम्पचे प्रवेशद्वार सांभाळले. पोट, पाय, पाठ यात गोळ्या शिरल्या असूनही घायाळ अवस्थेतील डॉनलॉनने आपल्या सहकाऱ्यांना दारूगोळा पुरवला, जखमी सैनिकांना सुरक्षित ठिकाणी हलवले, शत्रूच्या माऱ्यातून ६० मिलिमीटरची उखळी तोफ वाचवली; ८१ मिलिमीटरचा तोफखाना वाचवून शत्रूला जेरबंद केले. दुसऱ्या दिवशी ५४ व्हिएतकॉंगचे सैनिक मृतावस्थेत सापडले. डॉनलॉनच्या या अजोड पराक्रमाबद्दल अमेरिकेचे प्रेसिडेंट जॉन्सन यांच्या हस्ते रॉजरचा व्हाइट हाऊसमध्ये सुवर्णपदक व मानचिन्हाची निळी फीत देऊन सत्कार करण्यात आला; त्याच्या शौर्याची माहिती देणाऱ्या अधिलेखाचे वाचन संरक्षणमंत्री मॅकनमारा यांनी केले. हा सत्कार डॉनलॉनच्या ए-७२६ या डिटॅचमेंटमधील सी कंपनीतील स्पेशल फोर्सेस ग्रूप ७च्या बारा जणांचा होता. त्यापैकी तिघेजण धारातीर्थी पडले होते, आणि उरलेले नऊ विजयी वीर व्हाइट हाऊसमध्ये त्यावेळी हजर होते. ग्रीन बेरेट मानचिन्ह त्या प्रत्येकाच्या गळ्यात होते. स्वातंत्र्यासाठी आत्मसमर्पण करायला सिद्ध असणाऱ्या शूर सैनिकांच्या कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक म्हणून या मानचिन्हाला अमेरिकेत मानाचे स्थान आहे.

डॉनलॉन याने आपल्या आत्मकथनात आपले बालपण, अमेरिकेत लष्करात प्रवेश घेण्यापूर्वी केलेले नाना उद्योग, वडिलांचे आजारपण, हायस्कूलच्या फूटबॉलच्या टीममधील सहभाग, आळंबी वेचण्याचे काम करताना झालेली गडबड, कुक्कुटपालनातून कमाई करून

शिक्षणासाठी केलेली आर्थिक जमवाजमव, मुलींच्या वसतिगृहातील मुख्य वेटरची नोकरी, वगैरे पूर्वायुष्यातील घटना प्रथम सांगितल्या आहेत. पुढे मिलिटरी अकादमीत प्रवेश मिळवण्यासाठी प्रिपरेटरी शाळेचा कोर्स संपवून प्रवेश परीक्षा दिली. हवाई सेनादलातून निवृत्त युनायटेड स्टेट मिलिटरी अकादमीत प्रवेश मिळवला. वर्षभरानंतर ते शिक्षण सोडून आर्मी प्रायव्हेट म्हणून न्यू ऑर्लियन्समध्ये लष्करात नाव नोंदवले. नवव्या इन्फन्ट्रीत पहिल्या बटालियनमध्ये प्लॅटून लीडर म्हणून नेमणूक झाली. डोंगरी भागातील लष्करी शिक्षणाचा अभ्यासक्रम संपवला. स्पेशल फोर्समध्ये प्रवेश मिळवून १९६३ साली वयाच्या २९व्या वर्षी कॅप्टन म्हणून बढती झाली. १२ जणांची स्पेशल फोर्सची एकेक टीम. त्यात ७व्या विभागाचे ग्रीन बेरेट डॉनलॉनने मिळवले. २२ नोव्हेंबर १९६३ रोजी प्रेसिडेंट केनेडी यांची हत्या झाली, त्यावेळी त्यांची शवपेटिका वाहून नेण्याची जबाबदारी स्पेशल फोर्सकडे होती. मिसेस जॅकेलिन केनेडी यांच्या अनुज्ञेने शवपेटिकेवर स्पेशल फोर्सचे ग्रीन बेरेट लावण्यात आले. ए-७२६च्या बारा जणांच्या तुकडीला सखोल प्रशिक्षण देण्यात आले, आणि १९ जानेवारी १९६४ रोजी १०० मैलांची पायी रपेट - तीही डोंगराळ भागातून व पाठीवर अवजड ओझे घेऊन - मारण्याचे काम त्यांजवर सोपवण्यात आले. परस्परांशी निकट संपर्क यावा म्हणून ही रपेट असे सांगण्यात आले. या टीमचे नेतृत्व अर्थातच डॉनलॉन याजकडे आले.

या बारा जणांच्या ग्रूपने २३ मे १९६४रोजी व्हिएतनामकडे प्रयाण केले. २७ मे रोजी सायगाव विमानतळावर ते उतरले. डॉ. नांग या बंदराकडे त्यांना पाठवण्यात आले. कँपचे क्षेत्रफळ एक हजार फूट × ७५० फूट होते. जेवणाचे कंत्राट एका व्हिएतनामी सैनिकाच्या पत्नीने घेतले होते. नाम डाँगच्या डोंगरखोऱ्यातील नऊ खेड्यांचा देखभाल व सुरक्षा याची जबाबदारी या टीमवर होती. कॅप्टन विनच्या पथकात व्हिएतनामी सैनिकांचे स्पेशल फोर्स युनिट होते. शिवाय १५४ सैनिकांची नागरी संरक्षक दले होती. ६० व ८१ मि. मी. उखळी तोफांसाठी घळी व खाचरे तयार केली गेली. १५ फूट रुंद, ३० फूट लांब व ८ फूट उंच भुयारी शेल्टर बांधण्यात आले.

३० जून रोजी कँपवर गोळीबार झाला. तेव्हा अमेरिकन सैनिक प्रतिकारासाठी सिद्ध झाले. परंतु कॅ. विनने मात्र सबुरीचा सल्ला दिला. ५ जुलै रोजी व्हिएतनामी सैनिकांमध्ये एका तरुणीवरून वाद झाला. नंतर व्हिएतकाँगने हल्ला केला. डॉनलानने वायरलेसवरून संदेश पाठवला. ''प्रकाशझोत व चढाई करणारे विमान पाठवा''. मुख्य इमारतीवर हातगोळे पडले. ती इमारत आगीने वेढली गेली.

व्हिएतकाँगशी झालेल्या चकमकीत जबरदस्त हानी होते. डॉनलॉनला गोळी लागते, इतरही अनेक अमेरिकन सैनिक मृत्युमुखी पडतात. नंतर दोन मोठी लढाऊ विमाने व सहा हेलिकॉप्टर्स व्हिएतनामवर हल्ला करतात. अभूतपूर्व पराक्रम गाजवू डॉनलॉन व्हिएतकाँग सैनिकांना पळवून लावतो. वर म्हटल्याप्रमाणे तो राष्ट्राध्यक्षांकडून ढाल मिळवतो. अमेरिकेत त्यांची



पाठवणी होते. उपचार सुरू होतात. त्यावर राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते मिळालेल्या मानपत्राने व सत्काराने शिक्कामोर्तब होते. ए-७२६चे हयात सैनिक अर्लिंगटनच्या केनेडीच्या थडग्यापुढे एकत्र येऊन प्रेसिडेंटच्या स्मृतीला फुले वाहतात.

- व्हिएतनाम युद्धातील एका गाजलेल्या घटनेतील नाट्य जाणून त्याची हकीकत लिहिण्याचा हा उपक्रम अमेरिकेतील लष्करी जीवनावर प्रकाशझोत टाकणारा आहे.

**एकदाच अशी रात्र येते, पृष्ठे १२६, सत्तर रुपये**

---

## राजीव गांधी यांची विविध विषयांवरील चिंतनसूत्रे

# *निमित्तानिमित्ताने*

**अनु. शांता शेळके**

पंतप्रधानकीची सूत्रे एका आणीबाणीच्या क्षणी १९८४ साली राजीव गांधी यांना स्वीकारावी लागली; आणि भारताच्या सर्वांगीण विकासाला एक तरुणसुलभ जोमदार गती लाभली. एकविसाव्या शतकाची स्वप्ने भारतातील प्रत्येक व्यक्तीला प्रोत्साहित करू लागली. राजकारणाशी अनभिज्ञ असणाऱ्या राजीव गांधींनी देशाचा कारभार उत्साहाने चालवला; अनेक धाडसी निर्णय घेतले. काही निर्णय गोत्यात आणणारे वा चुकीचेही ठरले. परंतु त्यांच्या प्रत्येक कृतीत एक प्रकारची धडाडी आणि तातडी (अर्जन्सी) होती. त्यामुळे क्वचित त्यांनी उचललेली पावले उतावीळपणाचीही ठरली. परंतु एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेला आणि उदारीकरणाला सुबत्तेकडे व समृद्धीकडे नेण्याचे त्यांचे धोरण होते. त्यांच्या अकाली झालेल्या हत्येने या प्रक्रियेला काही प्रमाणात तरी खीळ बसली.

राजीव गांधी यांच्यासारख्या आधुनिक तंत्रज्ञान-इलेक्ट्रॉनिक्सशी परिचित तरुणाने दूरदर्शनसारख्या प्रसारमाध्यमाचा कौशल्याने वापर करून आपल्या भावभावनांमध्ये संपूर्ण भारतीय जनतेला सामावून घेण्याचा प्रयत्न केला. दूरदर्शन म्हणजे राजीव दर्शन असेही काहीजण त्यामुळे म्हणत राहिले. परंतु भारताच्या विविध प्रश्नांबद्दल आपली भूमिका नि:संदग्धपणे,

मोकळ्या मनाने मांडण्यासाठी प्रसारमाध्यमांचा राजीव गांधींनी चांगला उपयोग करून घेतला यात शंकाच नाही.

राजीव गांधी यांची विविध व्यासपीठांवरून झालेली तसेच दूरदर्शनवरची विविध प्रसंगोचित व्यक्तव्ये ऐकताना त्यांच्या तरुणसुलभ उत्साहाबरोबरच त्यांच्या प्रत्येक विधानाला एका व्यापक सर्वंकष अशा जागतिक व भारतीय संदर्भाची चौकट असल्याचेही जाणवे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय प्रश्नांबद्दलची भारताची भूमिका त्यातून स्पष्ट होत असे.

राजीवजींच्या भाषणांचे व संभाषणांचे पाच खंड केंद्र सरकारच्या प्रकाशन विभागातर्फे निघालेले आहेत. त्या भाषण-संभाषणातून विविध विषयांवरील विचार, वेचक मते व विधाने संकलित करून जगमोहन सिंग राज यांनी 'कोट्स् ऑफ राजीव गांधी' हे पुस्तक तयार केले. त्याला सोनिया गांधी यांनी छोटेसे प्रास्ताविकही जोडले. त्या पुस्तकाचे मराठीकरण प्रसिद्ध लेखिका शांता शेळके यांनी केले असून, ते मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे नुकतेच बाजारात आले आहे.

सोनिया गांधी यांनी प्रास्ताविकात म्हटले आहे, ''या भाषण संभाषणांतून राजीवजींना किती वेगवेगळ्या विषयांत रस होता आणि किती गोष्टींबद्दल त्यांना काळजी वाटत असे याचा स्पष्टपणे प्रत्यय येतो. भारताच्या, इतकेच नव्हे तर एकूण जगाच्या, भवितव्यासंबंधी त्यांनी आपल्या मनाशी रंगवलेले उज्ज्वल चित्र, विविध गुंतागुंतीच्या समस्यांची उकल करण्यासाठी त्यांना अभिप्रेत असणारे मार्ग आणि त्यांचे एकंदर राजकीय तत्त्वज्ञान यांची रूपरेषाही त्यातून साकार होते. त्यांचा शब्द न् शब्द ही भविष्याची आशादायक नांदी आहे. या पुस्तकातून वाचकाला त्यांच्या समग्र व्यक्तिमत्त्वाच्या थोरवीचा अंदाज येऊ शकेल... राजीव गांधी यांची स्मृती चिरकाल राहावी, या देशाच्या संदर्भातले त्यांचे योगदान लक्षात यावे या दृष्टीने हे पुस्तक मोठ्या जनसमूहापर्यंत पोचायला हवे, त्याचे मन:पूर्वक स्वागत व्हायला हवे.''

या पुस्तकातील विचार हे विशिष्ट विषयांच्या अनुरोधाने मांडले आहेत; परंतु हे गट शीर्षक उपशीर्षक याद्वारे वेगळे काढलेले नाहीत. त्यामुळे काहीसे स्वैरचिंतन अशा स्वरूपातच त्यांची मालिका पुढे येते. जातीय विद्वेष, सर्वसमभाव, निधर्मी राज्य, स्वदेशी, फुटीरपणा, भारताचे सामर्थ्य, अलिप्ततावाद, तंत्रज्ञान, दारिद्र्य निर्मूलन, सांस्कृतिक परंपरा, स्वावलंबन, वसाहतवादाविरुद्ध लढा, कामगार शक्ती, मानवी घटकाचा विकास म्हणजे खरा विकास, विज्ञान व विकास, अणुशक्तीचा वापर, वैज्ञानिक मानसिकता, शिक्षणाचे उद्दिष्ट, अपंगत्वावर विजय, स्त्रीशक्ती, संसदेचे कार्य, नि:शस्त्रीकरण, अणुस्फोट, सांस्कृतिक वारसा, सामूहिक सहजीवन, युवाशक्तीला आव्हान, जागतिक अर्थव्यवस्था, नैसर्गिक उत्पादनांचा यथोचित वापर, आर्थिक प्रगती, निसर्गाचे शोषण, स्वातंत्र्य चळवळ, मूलभूत हक्क, स्वातंत्र्य व वंशवाद, जागतिक शांतता, लोकशाही, अहिंसा, धर्मनिष्ठा व आध्यात्मिक जाणीव, साक्षरतेचा खरा अर्थ, संस्कृतीची जडणघडण, वर्णसंकर, विज्ञानकक्षा, समाजवादाचे भारतीय रूप, भारतापुढील प्रश्न, परराष्ट्रीय



धोरण, कलावंतांचे सामर्थ्य, सत्तालोभ, अल्पसंख्याकांचे प्रश्न, सहिष्णुता व स्वातंत्र्य, वृत्तसंस्थांची जबाबदारी, भाषांचे सामर्थ्य, संशोधन, बालकांचे संवर्धन-संगोपन, जागतिक सत्ता संतुलन, राज्ययंत्रणेचे गुणदोष, गरीब व श्रीमंत देश यातील तणाव अशा अनेक विषयांवरील हे सूत्रात्मक विचार सद्य:परिस्थितीतील वेगवेगळ्या प्रवाहांचे दिग्दर्शन करतात. काही विधाने तर सहजपणे आपल्या मनात घर करू शकतील, इतकी अर्थपूर्ण व अल्पाक्षरी आहेत.

- ◆ धर्मातीत भारत हाच चिरंतन राहणारा भारत होऊ शकेल. धर्मातीत नसणारा भारत हा कदाचित चिरंतन राहण्याच्या लायकीचाच नसेल.
- ◆ अलिप्ततावाद हा राष्ट्राच्या स्वयंनिर्णयाच्या आकांक्षेवर आधारलेला आहे.
- ◆ सर्जनशील प्रवृत्ती फुलून येण्यासाठी अनुकूल वातावरण हवे.
- ◆ धर्मनिरपेक्षता याचा अर्थ सत्याचा अखंड पाठपुरावा. सत्य हेच अंती विजयी ठरेल यावरची दृढ श्रद्धा.
- ◆ आमच्या सांस्कृतिक एकात्मतेचा कोणताही भाग आम्ही जर गमावून बसलो तर भारत हा खऱ्या अर्थाने भारत राहणार नाही.
- ◆ केवळ विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकास म्हणजे खऱ्या अर्थाने आधुनिकीकरण नव्हे.
- ◆ भय आणि उणिवा यापासून मुक्तता मिळवणे ही आजची जागतिक समस्या आहे.
- ◆ मानवता म्हणजे स्वार्थभावनेवर तत्त्वनिष्ठेने मिळवलेला विजय.
- ◆ आमची धर्मनिष्ठा हा आमच्या आध्यात्मिक जाणीवेचा प्रबळ भाग आहे.
- ◆ क्षुद्र मने व भित्री कमकुवत हृदये कधीही प्रचंड कार्ये करू शकत नाहीत.
- ◆ माणसाचे माणूसपण किती उन्नत व समृद्ध झाले आहे हेच कोणत्याही विकासाचे एकमेव गमक होय.
- ◆ सहिष्णुता, सहजीवन, अंतर्गत परस्परावलंबी कृतिशीलता व एकूण समृद्धी या गोष्टी आमच्या राज्ययंत्रणेला बळकटी आणतील.
- ◆ मनुष्यस्वभावातील मूलभूत चांगुलपणा व सौजन्य यावर आमची श्रद्धा अवलंबून आहे.
- ◆ वंशवाद आणि वसाहतवाद यांचे ओझरते अवशेष देखील स्वातंत्र्य व न्याय यांना लांछनास्पद आहेत.
- ◆ अखिल जगातील मानवाचे कल्याण करणे हाच सर्वप्रमुख कायदा आहे.
- ◆ महिला म्हणजे समाजाची सामूहिक सदसद्विवेक बुद्धी होय. कोणत्याही समाजाला एकत्र निगडित ठेवण्याचे काम महिलाच करतात.
- ◆ संपूर्ण सत्याची जपणूक व विकास हेच शैक्षणिक संस्थांचे प्रथम उद्दिष्ट हवे.
- ◆ स्वावलंबनाचा उगम माणसाच्या मनात होतो.
- ◆ सुसंवादी समाजाची संकल्पना ही एकूणच समतोलावर आधारलेली आहे. उत्पन्नाची साधने व लोकसंख्या, ऐहिक समृद्धी आणि बौद्धिक-नैतिक-आत्मिक विकास, निसर्ग आणि माणूस

- या साऱ्यात समतोल हवा.

◆ विचार व वस्तू सर्वत्र पोचवण्याचे सर्वोत्तम साधन म्हणून मी राज्ययंत्रणेकडे पाहतो.

–अशी कितीतरी विधाने उद्धृत करता येतील. राजीव गांधी यांच्या आंतरिक तळमळीचे त्यातून प्रत्यंतर येते. त्यामुळे ते प्रेरक व मार्गदर्शक ठरते.

**निमित्तानिमित्ताने, पृष्ठे ११५, सत्तर रुपये**

---

**प्रकाशपूजक कवीचे**
**विलोभनीय**
**शब्दसूक्त**

# करार एका ताऱ्याशी

**सं. वसंत पाटील**

कविवर्य कुसुमाग्रज यांच्या नावाचा 'कुसुमाग्रज तारा' २७ फेब्रुवारी १९९६ पासून नभांगणात चमकत आहे. कुसुमाग्रजांच्या एकूण कवितेत आकाशाच्या संदर्भातील कवितांची संख्याही लक्षणीय आहे हे त्यांचे एक चाहते व भक्त वसंत पाटील यांच्या लक्षात आले; आणि कुसुमाग्रजांच्या संमतीने या आकाशविषयक कवितांचे स्वतंत्र संकलन करावे असे त्यांनी ठरवले. जीवनलहरी ते महावृक्ष या कुसुमाग्रजांच्या काव्यसंग्रहातील साठ कविता त्यांना सूर्य, आकाश, तारका, उषा, चंद्र, कृष्णविवर पृथ्वी, नक्षत्रे, मेघमंडळ, सायंकाळ, आकाशकन्या, सूर्यपुत्र, प्रकाश-काळोख अशा विषयांशी संबंधित असल्याचे आढळले. त्या त्यांना स्वतंत्र पुस्तकासाठी निवडव्याशा वाटल्या. त्याला वीस पृष्ठांची अभ्यासपूर्ण 'प्रकाशाचा लावण्योत्सव' या नावाची प्रस्तावनाही त्यांनी जोडली आहे; ती कुसुमाग्रजांच्या काव्याची एक नवी संगती लावून दाखवते. त्यामुळे विशेष महत्त्वाची आहे.

'जीवनलहरी' या पहिल्याच संग्रहातील हे प्रकाशदात्या सूर्याचे होणारे आगमन पहा.

'आला रथ उदयाचलि। ज्वालेसम झळके ध्वज
उधळी ही चक्रगती। नीलावर आरुण रज
वेदांनी अभिवादन केलेल्या तेजोधन
तिमिराच्या वेशीतून। धरतीवर येत पुन्हा।।'



सूर्याने अंधाराचा नाश केला असे न म्हणता, अंधाराच्या भव्य वेशीतून तेजोधन सूर्य धरतीवर प्रवेश करतो या कल्पनेतूनच कुसुमाग्रजांचे वेगळेपण जाणवू लागते. 'रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल' या सुभाषितसदृश ओळीतही उष:कालाची जननी म्हणून रात्रीला 'श्रेय' दिले आहे. प्रकाश व काळोख यांची भेट ते नाट्यपूर्ण दाखवतात. प्रकाश हा अंधाराला 'सांजपहाटेला भेटू जरा वेळ' असे आश्वासन देतो. अंधार-प्रकाशाचा सनातन संघर्ष हा असत्प्रवृत्ती व सत्प्रवृत्ती यातील संघर्ष - ही कल्पना अर्थातच सारेच कवी मांडतात. 'तमसो मा ज्योतिर्गमय' अशी सर्वांचीच भावना प्रकाशाच्या आवाहनाची असते.

''जीवनलहरीपासून उदयास आलेली ही प्रकाशोपासना हळूहळू आंतरिक बनत चाललेली, स्थूलाकडून सूक्ष्माकडे चाललेली दिसते'' असे वसंत पाटील यांना वाटते. 'ज्वालांत जळू द्या तम सारा' अशा अभिनिवेशयुक्त आवाहनाबरोबरच, 'या माझ्या ह्रदयावर प्रकाशप्रभूने आपले पवित्र पाऊल ठेवावे' अशी आर्त आळवणीही येते; तेव्हा कवी सृष्टीतल्या अंधारापासून मनाच्या अंधाराकडे वळलेला दिसतो असा पाटील यांचा निष्कर्ष आहे.

'विशाखा' मधील 'उष:काल', 'हिमरेषे'तील उषास्तवन व 'पाथेय'मधील उषासूक्त यातील 'उषा' ही कशी अधिकाधिक व्यापक होत जाते याचा निर्देश करताना पाटील म्हणतात: ''यातील उषेचे वर्णन सांकेतिक नाही. यातील उषा म्हणजे महाकवीची समूर्त दिव्य वाणी! रात्र म्हणजे स्वप्नांचा खजिना. तो घाईगर्दीत घेऊन जाताना चुकून राहिलेले स्वप्न म्हणजे उषा... हिमरेषेतील उषास्तवन हे वैदिक ऋषींच्या थाटातले आहे. पाथेयमधील उषासूक्तात 'सूर्याचा सांगावा शिंपीत येणारी व अंती सूर्यात आपले अस्तित्व विसर्जित करणारी उषा' भेटते. सगुणस्तवनाने आरंभ करून निर्गुणाकडे हे उषासूक्त अलगदपणे वाचकाला नेते. उषेनंतर सूर्य उगवतो. तो कुसुमाग्रजांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. सूर्य हा विराट तेजोगोल. तो नवजीवन देतो. प्रेम देतो. आधार देतो.

'पृथ्वीचे प्रेमगीत' हे प्रकाशमूर्ती सूर्याचे स्तोत्र आहे. सूर्याला उर्जास्रोत, देव मानून त्याची उपासना केली जाते. परंतु येथे कुसुमाग्रज त्याला पृथ्वीचा प्रियकर मित्र म्हणून पेश करतात. येथे दूरस्थ सूर्यासाठी पृथ्वी आपले सर्वस्व मनोभावे अर्पण करून त्याच्याभोवती अहोरात्र परिभ्रमण करीत राहते. तर चंद्र-ग्रह-तारे-अवघे तारांगण हे या पृथ्वीच्या मोहात पडलेले आहेत. सूर्याशी आपले मीलन होणार नाही हे जाणूनही पृथ्वीची भव्य तेजाची आरती अखंड चालूच राहते. ही प्रेमाची तऱ्हा शारीर वा भक्तिमय न राहता आत्मसमर्पणात्मक आहे. आनंदाने पृथ्वी चिरविरहाचा उत्कट स्वीकार करते.

सूर्य आणि पृथ्वी या दोघांनाही एकमेकांची ओढ आहे; तसाच एकमेकांबद्दल आदर आहे. सूर्य हा पृथ्वीवरच्या स्वयंसिद्ध प्रकाशाच्या वसाहती पाहून विस्मित होतो. (पाथेय). त्याचबरोबर सूर्य म्हणजे आत्मशक्तीचे प्रतीक आहे. माणसाच्या मन:सामर्थ्याचा ध्वज म्हणून तो डौलाने फडकतो. माणसाला काळोखातून दूर काढून आपले पौरुष गाजवण्यासाठी असीम दिगन्त

अवकाश आणि विशाल धरती यांचे दर्शन घडवतो.

कुसुमाग्रजांच्या कवितेत चंद्र, तारे, नक्षत्रे, आकाश, गती यांना असाधारण महत्त्व आहे. त्या सर्वांशी संवाद साधण्याचा प्रयत्न दिसतो.

''देवाचे काव्य पहा, ते मरत नाही, जीर्ण होत नाही.'' (देवस्य काव्यं पश्य, न ममार न जीर्यति - अथर्ववेद १०-८-३२) या उक्तीप्रमाणे कुसुमाग्रजांनी 'तारकांच्या प्रेमात पडून आकाशाशी करार केला आणि त्यातील एक तारका मालकीची करून टाकून, तिच्यावर निवास केला. व्यवहारापुरता कवी येथे (धरतीवर) वावरत असला तरी पृथ्वीवर द्वेषाचे ज्वालामुखी जागे होतात तेव्हा कवीचे खिन्न मन या तारकेवरच विसावते.'' असे विवेचन पाटील करतात. 'निशेच्या अंधाऱ्या मांडवामध्ये–अंतर तुटून - भिन्नता लोपून - एका घटकेसाठी आपण एक'' अशी आपली भावना ते व्यक्त करतात.

तारकांचे दर्शन हे ईश्वराचे दर्शन, प्रकाशाचा साक्षात्कार. उत्तररात्रीचे चांदण्यांनी खचलेले, अपार धूसराने ओथंबलेले आकाश हे ईश्वराच्या अस्तित्वाचे साक्षीदार होय असे त्यांना वाटते. कुसुमाग्रज हे प्रकाशपूजक आहेत. ''आयुष्यभर सूर्य-चंद्र-तारकांचे तेज शब्दाशब्दांतून मुक्त हस्ते उधळणारे, काळ्या मातीत तारकांचे तेज पेरणारे, पक्ष्यांच्या पंखात व झऱ्यांच्या गीतांत आकाश पेरणारे, जमिनीत नक्षत्रांचे रोप लावणारे'' क्रांतदर्शी कवी कुसुमाग्रज 'उजेडाचा उगम सूर्यामध्ये नसतो, माणसाच्या मनामध्येच असतो' असेही 'विदूषका'च्या तोंडून वदवतात. नुसते तारकांचे गाणे ते गात नाहीत, परमतेजाचे तत्त्वदर्शन, परतत्त्वाचा स्पर्श घडवतात. 'काळोखामध्ये जपा उजेडाचा वसा' असा आग्रह धरतात. माथ्यावर तेजोमय नक्षत्रांचे आश्वासन असल्याने एकूण प्रवास सुंदर झाला अशी कृतार्थ ग्वाही ते देतात.

'देणं' ही कविता छोटीशी आहे; पण मोठी अर्थगर्भ आहे.

मातीपण मिटता मिटत नाही
आकाशपण हटता हटत नाही
आकाशमातीच्या या संघर्षात
माझं जखमांचं देणं फिटता फिटत नाही

–आणि आकाशाशी झालेला करार त्यांच्याच शब्दांत वाचायला हवा.

खूप खूप वर्षांपूर्वी
आकाशाशी माझा करार झाला
आणि आकाशगंगेतील ती छोटी तारका
निळ्या-पारव्या प्रकाशाचा पिसारा फुलवणारी
माझ्या मालकीची झाली.
तेव्हापासून पृथ्वीवर जेव्हा ज्वालामुखीच्या उद्रेकांनी उसासलेली उद्यानं दग्ध होतात
किंवा कोकिळांची कूजनं बर्फाच्या प्रपातात



गोठून मरून पडतात
तेव्हा माझा निवास त्या तारकेवरच असतो,
व्यवहारापुरता मी येथे वावरत असलो, तरी.

**करार एका ताऱ्याशी, पृष्ठे ९२+२०, पन्नास रुपये**

# फुले आणि काटे

### सत्तर वर्षापूर्वीचा ज्ञानकोशकारांनी दिलेला इशारा

महाराष्ट्रीय ज्ञानकोश हा महाराष्ट्राचे बौद्धिक स्वातंत्र्य स्थापन करण्यासाठी झालेला प्रयत्न होय. एका राष्ट्रास दुसऱ्या राष्ट्रावर बौद्धिक बाबतीत परावलंबी राहणे धोक्याचे व अत्यंत कमीपणाचे आहे. वेदात काय आहे हे आपण इंग्रजास किंवा जर्मन माणसास विचारावे यासारखी खेदाची दुसरी कोणती गोष्ट आहे बरे? संस्कृत ग्रंथांची भाषांतरे हिंदुस्थानातील कोणत्याही भाषेत विशेष झालेली नाहीत. पाश्चात्य देशात सामान्य ठिकाणी जशी ग्रंथालये आहेत तशी मुंबईस किंवा कलकत्त्यासही नाहीत... एकंदर ज्ञानक्षेत्राविषयी तर बोलावयासच नको. भौतिक शास्त्र व तंत्रज्ञ कला यांच्या बाबतीत तुलनाच हास्यास्पद होईल... पाश्चात्यांचे संशोधन गोळा करावे, तपासून घ्यावे, ग्राह्य असेल ते घ्यावे, त्याज्य असेल ते टाकावे... पण हे सर्व कोणी करावे? गचाळपणा व इंग्रजी भाषा तरुणांच्या घशात कोंबण्याची हाव असलेल्या येथील युनिव्हर्सिट्यांकडून हे काम होईल अशी आशा वाटत नाही. पाश्चात्यांचे शिष्यत्व योग्य आहे पण ते जगातील चढाओढीत जय पावण्यासाठी आहे. पाश्चात्य पांडित्यामुळे घाबरून हतवीर्य होण्यासाठी नाही. हा सर्व विचार आम्ही ज्ञानकोश तयार करताना जागृत ठेवला होता.

*–ज्ञानकोशकार केतकर (माझे बारा वर्षांचे काम उर्फ ज्ञानकोश मंडळाचा इतिहास. १९२७साली लिहिलेल्या लेखातून)*

### मी सतत अस्वस्थ

मी सतत अवतीभवतीच्या समाजाची बारकाईने पाहणी करत असते, सतत अवतीभवती घडणाऱ्या घटनांचा शोध घेत असते. त्यामुळे मला कादंबरी हा प्रकार सुखद वाटतो. कादंबरीचा आवाका मोठा असतो. तिच्या क्षमताही अचाट असतात. लेखन हे अत्यंत एकाकीपणाचे काम आहे. एकट्याने करायचे काम आहे. कोणाचीही त्यात मदत होत नाही. लेखनासाठी चिकाटी लागते. त्यात सर्वस्व ओतावे लागते. गंभीरपणे हे सारे करावे लागते. मध्येच सोडून चालत नाही. मी सतत अस्वस्थ असते. या अस्वस्थतेतूनच माझे लेखन घडते.

*–शशी देशपांडे (इंग्लिश कादंबरीकार) (टाइम्स ऑफ इंडिया १३-१-१९९८)*

### सर वॉल्टर स्कॉट

सर वॉल्टर स्कॉट हा ब्रिटिश असला तरी त्याच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांनी अमेरिकेतील वाचकांना कादंबऱ्या वाचण्याचे वेड लावले. या कादंबऱ्यांत ऐतिहासिक घटनांबरोबर दंतकथांचे व काल्पनिक घटनांचेही मिश्रण असे; परंतु त्याची निवेदनशैली इतकी चटकदार व रोमांचकारक असे की त्या वाचताना वाचक तहानभूक विसरून जात. फिलाडेल्फियात त्यावेळी दहा प्रकाशन संस्था वॉल्टर स्कॉटच्या कादंबऱ्यांच्या आवृत्त्यांवर आवृत्या काढून खपवण्यात मग्न होत्या. त्याच्या कादंबऱ्यांच्या पाच पाच लाख प्रती त्या काळात काही वर्षात खपल्या. वॉल्टर स्कॉट हा ब्रिटिश होता; पण त्याच्या इव्हानहो या कादंबरीच्या नायिकेच्या नावावरून रोवेना हे नाव अमेरिकेत मुलींना ठेवण्याची एक लाट आली होती; आणि त्याच्या कादंबरीत वर्णन केलेल्या वेव्हर्ली ह्या नावाची अमेरिकेत ३५ गावे आहे ही बाबही लक्षात ठेवण्यासारखी आहे.

त्याच्या कादंबऱ्यांपासून स्फूर्ती घेऊन अमेरिकेतील यादवी युद्धाच्या पार्श्वभूमीवर लिहिली गेलेली 'गॉन वुईथ दि वुइंड' ही कादंबरी देखील बेस्ट सेलर ठरली.

### आजची दीर्घकथा

कालची लघुकथा हीच एक अपरिहार्यतेने आजची दीर्घकथा होऊ बघते आहे. ती तिच्यातल्या व्यामिश्र जीवनार्थाने ! एकरेघी आयुष्यच आता राहिले नाही. कथा ही जीवनावर क्षणमात्र एक तेजाचा झोत टाकत असते. तो झोत एखाद्या स्फटिकासारखा असतो. आजच्या कथेत हे सामावू न शकल्याने ती अपरिहार्यतेने दीर्घ होत चालली आहे. या कथेत एकाच वेळी लघुकथेची सूक्ष्मता आणि प्रदीर्घ कथेची व्यामिश्रताही आहे. आजची दीर्घकथा हा या कथेच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

*–डॉ. सुलभा हेर्लेकर (आशा बगे : नवे अस्तित्व या पुस्तकातून)*

### मिरासदार व बीची

कन्नड जागृती आंदोलनात विनोदकार बीची यांनी सक्रिय भाग घेतला होता. प्रवृत्तीने गंभीर आणि विचाराने धार्मिक असलेल्या कन्नड वाचकांच्या मनात विनोदाची अभिरुची निर्माण करण्यात बीची यांचाच सिंहाचा वाटा आहे. हेच त्यांच्या साहित्याचे खरे श्रेय.

मिरासदारांच्या लघुकथांच्या तुलनेत कन्नडमधील विनोदी लघुकथा साहित्यिकदृष्टया कोठे आहे? कशी आहे? असा प्रश्न येतो तेव्हा दोन तीन गोष्टी जाणवतात. मिरासदारांची कथा ही प्रामुख्याने घटनाप्रधान व प्रसंगनिष्ठ आहे. मिरासदार आपल्या अस्सल गोष्टीवेल्हाळ निवेदनशैलीने आणि मिस्कीलपणे गोष्ट रंगवीत नेतात. त्यांच्या कथेत अतिशयोक्ती आहे पण अद्‌भुत आणि अवास्तवतता नाही. नाट्यात्मक उपरोध ही त्यांच्या विनोदाची एक मोठी शक्ती आहे. 'माझी पहिली चोरी', 'व्यंकूची शिकवणी', 'बापाची पेंड' या त्यांच्या गाजलेल्या कथांतून उपहास हा किती कलात्मक रूपात प्रकट करता येतो हे पाहण्यासारखे आहे. मिरासदारांच्या मागे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, चि. वि. जोशी, गडकरी, अत्रे, पु. ल. अशी एक मोठी परंपरा आहे. कन्नडमध्ये अशी मोठी परंपरा नाही. आधुनिक कन्नडकथेचा जन्म झाला तोच मुळी १९२५-

३०च्या सुमारास. मराठीतील विनोदाने परंपरांच्या चौकटी सैल करण्यात मोठे यश मिळवले आहे. सामाजिक आंदोलने आणि राजकीय जागृती या क्षेत्रात विनोदी साहित्याने मराठीला एक तात्त्विक बैठक मिळवून दिली. कन्नडमध्ये असे काही होऊ शकले नाही. कन्नड साहित्याचे आणखी एक वेगळेपण जाणवते, ते म्हणजे जीवनाचे आकलन समग्र, व्यापक, भव्य, विशाल अशा स्वरूपात करणे हे कन्नड साहित्यिकांना अधिक भावते, त्यामुळे कन्नडमध्ये महाकाव्य, कादंबरी, लोकवाङ्मय हे मराठीपेक्षा अधिक समृद्ध वाटतात तर मराठीतील लघुकथा, लघुनिबंध, विनोद हे कन्नडपेक्षा अधिक संपन्न आणि सुंदर झाले आहेत. कन्नडमधील विनोद हा प्रामुख्याने नाटक, कादंबरी, लोकवाङ्मय या अंगाने व्यक्त झाला आहे. बीची, कस्तुरी, रंगनाथन्, चंद्रशेखर कंबार अशी काही अपवादात्मक नावे सोडली तर मिरासदारांशी तुलना करता येतील असे विनोदी कथाकार कन्नडमध्ये दिसत नाहीत.

*– डॉ. अ. रा. तोरो किर्लोस्कर, (जानेवारी ९८)*

# फेब्रुवारी १९९८ – स्पर्धांचे निकाल

**पहिली स्पर्धा**

फेब्रुवारी १९९८च्या अंकात दोन स्पर्धा दिल्या होत्या. 'लेखकांची नावे ओळखा' या स्पर्धेतील उत्तरे पुढीलप्रमाणे –

***लेखकांची नावे –*** देसाई, सावंत, खांडेकर, घाटे, शेळके, यादव, ओगले, पुंडे, वाळिंबे, शेलार, मांडे, वपु (काळे), खेर, साने, दळवी, केळकर, दया(पवार)

**यशस्वी स्पर्धक**

१) **दत्ता गोपाळ शेंडगे,** मु. पो. शिपोशी ४१५८०२, ता. लांजा, जि. रत्नागिरी.
२) **नामदेव बाबुराव कटके,** मु. पो. बाणेर ४१००४५, ता. हवेली (जि. पुणे)
३) **कमलेश कटारिया,** २०२ राजलक्ष्मी अपार्टमेंट, उल्हासनगर ४२१००५.
४) **पंढरीनाथ एकनाथ घाटे,** यशवंत विद्यालय, बोरगाव अर्ज, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद - ४३११३४.
५) **प्रमोद बळवंत जोशी,** श्रीनगर वसाहत, मांडवा रोड, अंबाजोगाई ४३१ ५१७.

---

**दुसरी स्पर्धा**

**पुरस्कार व पुस्तके जोड्या जुळवा**

फेब्रुवारी १९९८ अंकातील पुरस्कार व पुस्तके जोड्या जुळवा या स्पर्धेचे उत्तर पुढीलप्रमाणे :

१) ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी – साहित्य अकादमी पुरस्कार
२) अंधारयात्रा – भारतीय भाषा परिषद पुरस्कार
३) शिवशाहीचा शोध – दमाणी पुरस्कार
४) कळप – श्री ज जोशी पुरस्कार
५) लॅरी बेकर – महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार

**यशस्वी स्पर्धक**


१) **पी. पी. रायबागकर,** पोस्ट ऑफिसजवळ, स्टेशन रोड, नांदगाव, जि. नाशिक.
२) **कु. सुजाता शंकर शेवाळे,** पो. पेरेजपूर ४२४ ३०४, ता. साक्री, जि. धुळे.
३) **राजेंद्र गोपीनाथ भुजबळ,** चिखलठाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.
४) **कु. भक्ती विजय ठाकूर,** मळगाव इंग्लिश स्कूल, मळगाव, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.
५) **कु. ममता अजाबराव भगत,** पो. तिवरी ४४५ २०३, ता. दिग्रस, जि. यवतमाळ

यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन. भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना धन्यवाद.

यशस्वी स्पर्धकांनी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांतून रु. १०० पर्यंतची पुस्तके कळवावी. ती त्यांना पाठवण्यात येतील.



# —: शब्दकोडे सोडवा, बक्षीस मिळवा :—




रचनाकार : श्री विजय

**ग्रंथजगत शब्दकोडे : २**

शेजारील चौकानात बरोबर उत्तरे भरून दि. **१०मे १९९८** पर्यंत पाठवा. बरोबर उत्तरे पाठवणाऱ्यांपैकी (लॉट टाकून येणाऱ्या) पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी १०० रु.ची पुस्तके बक्षीस.
आमचा पत्ता : **मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव, पुणे–४११०३०.

***आडवे शब्द :***

१. बासू भट्टाचार्य यांचे आत्मकथनपर पुस्तक
३. वि. स. खांडेकरांच्या एका पुस्तकाचे नाव
५. 'प्रेम तुझ्यावर' या जेम्स हॅडली चेसच्या (अनुवादित) पुस्तकाचा कर्ता - मनोहर ×××
७. मंगला निगुडकरांनी अनुवादित केलेल्या डायरीची मूळ लेखिका ॲन ××
८. रणजित देसाई यांचे गायकाच्या जीवनावरचे एक नाटक
११. जयंत नारळीकरांशी संबंधित एक संस्था
१२. शुभा चिटणीसांनी अनुवाद केलेले मन्नू भंडारींचे पुस्तक

***उभे शब्द :***

१. चलम यांची तेलगू कादंबरी (नुकतीच ही मराठीत आली आहे)
२. वि. स. खांडेकरांचे एक पुस्तक
४. आनंद यादवांचे नवे पुस्तक
६. रणजित देसाई यांचे एक नाटक
९. आचार्य अत्र्यांनी संपादित केलेले एक साप्ताहिक
१०. आचार्य अत्र्यांच्या अग्रलेखांमुळे गाजलेले दैनिक

## नवी स्पर्धा

## विज्ञानकथाकार आणि त्यांची पुस्तके

### जोड्या जुळवा

विसाव्या शतकातील सर्वात प्रभावी असा नवा वाङ्मय प्रकार म्हणून विज्ञानकथांचा (सायन्स फिक्शन) उल्लेख केला जातो. मराठीत डॉ. जयंत नारळीकर यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शास्त्रज्ञाने विज्ञानकथा-कादंबऱ्या लिहून या वाङ्मयप्रकाराला प्रतिष्ठा मिळवून दिली. आजही काही लेखक निष्ठेने विज्ञानकथा मराठीत नियमाने लिहित आहेत. पुढे काही विज्ञानकथालेखक व त्यांची पुस्तके यांची नावे दिली आहेत. त्यांच्या बरोबर जोड्या जुळवून, कार्डावर लिहून आमच्याकडे पाठवा. अचूक उत्तर देणाऱ्या पाच स्पर्धकांना (लॉट टाकून) प्रत्येकी १०० रुपयांची पुस्तके बक्षीस देण्यात येतील.

| *विज्ञानलेखक* | *पुस्तके* |
|---|---|
| १) डॉ. जयंत नारळीकर | अ) वामनाचे चौथे पाऊल |
| २) निरंजन घाटे | ब) अखेरचा प्रयोग |
| ३) सुबोध जावडेकर | क) व्हायरस |
| ४) डॉ. बाळ फोंडके | ड) चंद्रावर स्वारी |
| ५) भा. रा. भागवत | इ) मृत्यूपत्र |
| ६) लक्ष्मण लोंढे | ई) संगणकाची सावली |
| | उ) यंत्रलेखक |
| | ऊ) दुसरा आइन्स्टाइन |

***उत्तर पाठवण्याची मुदत - १० मे १९९८***

आमचा पत्ता : **मराठी ग्रंथजगत,** मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणे - ४११ ०३०.

### वाचकांना आवाहन

मेहता मराठी ग्रंथजगतचे अंक फक्त वर्गणीदारांनाच पाठविले जातात. तरी वर्गणीदारांनी व इच्छुक वाचकांनी वर्षाची वर्गणी (५० रुपये व भेट पुस्तकाचे पोस्टेज १५ रुपये) मनीऑर्डरद्वारा त्वरित पाठवावी.



## राजकारणातील कटु सत्ये धिटाईने उघड करणारी पुस्तके

परिश्रम, निःपक्षपात व सामाजिकता ही सी. बी. आय. सारख्या गुन्हेगारीचे कसून अन्वेषण करणाऱ्या शासकीय संस्थेची तत्त्वत्रिसूत्री आहे. प्रत्यक्षात निष्ठेने, कर्तव्यतत्परेने काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या वाटेला कोणते भोग येतात, कोणत्या यातनांना तोंड द्यावे लागते, राजकीय नेत्यांकडून कशा अडचणी उभ्या केल्या जातात, हे भोगणाऱ्या माणसाचे हे आत्मकथन त्याच्या कष्टमय, यातनामय सेवेचे व्यथित करणारे चित्र उभे करते.

**द प्लेन ट्रुथ**
**अनुवाद : माधव मोर्डेकर**
पृष्ठे ३३६ मूल्य : दोनशेपन्नास रुपये

सध्या भारतीय समाजाच्या संपूर्ण क्षेत्रांवर केवळ राजकीय वा सरकारीच नव्हे, तर सर्व प्रकारच्या बिगरसरकारी संस्था, व्यक्ती, आदींच्या आचरणावर भ्रष्टाचाराने कब्जा केलेला आहे. अशा वेळी बोफोर्स प्रकरणातील भ्रष्टाचाराच्या संभाव्य रहस्याला वाचा फोडण्याचे साहस ओझा यांनी केलेले आहे. एका राजदूताने दिलेल्या पुराव्याला प्राप्त झालेले महत्त्व व निःसंशय मोठे आहे. प्रत्येक नागरिकाने हे सत्य जाणून घेणे अगत्याचे आहे.

**बोफोर्स**
**अनुवाद : माधव मोर्डेकर**
पृष्ठे १९२ मूल्य : एकशेदहा रुपये

# वाचकांचा प्रतिसाद

## चिनार आणि निवडुंग

भाऊसाहेबांचे व्यक्तिमत्त्व चिनार वृक्षासारखे उत्तुंग आहे. पण दुर्दैवाने आज निवडुंगी समीक्षक काटेफेक करण्यात धन्यता मानीत आहेत. कुणी म्हणतो ''हिन्दी मे होता तो आडे हातसे लेता! वाह रे बहाद्दर! बुटक्या निवडुंगाला उत्तुंग चिनार वृक्षाला स्पर्श तरी करता येईल काय? एका प्रोफेसर महाशयांनी समीक्षकी गौप्यस्फोट केल्याचा आव आणला. एका प्रोफेसर महाशयाला तर छिद्रेच छिद्रे दिसल्यामुळे त्याने सुंदर गालिच्याची मच्छरदाणीच करुन टाकली. एका विदुषीने डेस्मंड मकर्थीचा उल्लेख करुन आधुनिक कादंबऱ्याबरोबर खांडेकरांच्या कादंबऱ्यांना होल्डॉलची उपमा दिली व त्यात सर्व फुटकळ अनुभवांना घुसडून देण्यात आले आहे असे सूचित केले. खांडेकरांनी 'पांढरे ढग' या आपल्या कादंबरीच्या प्रस्तावनेत त्या विदुषीचा चांगलाच समाचार घेतला आहे. ययातीसारखी अक्षर चांगलाच समाचार घेतला आहे. ययातीसारखी अक्षर वाङ्मयात उठून दिसणारी कादंबरी खांडेकरांनी लिहून ज्ञानपीठाचा वाग्देवी पुरस्कार मिळविला. शारदेचा आशीर्वाद आणि वाङ्मयप्रेमी रसिकांची दाद मिळवली हे तर खरेच पण त्यामुळे आनंदी-कैकेयीचे वारसदार धुमसू लागले हे मराठी वाङ्मयाचे तसेच रसिकांचे दुर्दैव!

खांडेकरांना सर्पदंशाचा शाप आहे की काय न कळे! दोन वेळा विषारी साप चावूनही त्यातून ते सुदैवाने वाचले. पण त्यांच्या निधनानंतरही सर्पदंश चालूच आहेत. तक्षकांची कमी नाही. ''एक धुंडो हजार मिळते है'' हेच खरं! आज खांडेकर आपल्यात असते तर मोगऱ्यातील मोर व गरुडाने विषारी सापांच्या चिंधड्या उडविल्या असत्या आणि राजहंसाप्रमाणे नीर-क्षीर विवेक जपला असता!

माझ्यासारख्या हजारो वाचकांवर त्यांची मोहिनी इतकी जबरदस्त आहे की अत्यंत गरिबी असूनही मी एकावेळी २००० रुपयांची पुस्तके मेहता प्रकाशनाकडून विकत घेतली. मेहता प्रकाशनाने सुद्धा खांडेकरांची जास्तीत जास्त पुस्तके प्रसिद्ध करुन उच्च अभिरुचीचा प्रत्यय आणून दिला त्याबद्दल त्यांचा गौरव करायला हवा.

आजकालच्या खांडेकरांवरील टीकेचे स्वरुप असे आहे. एका बाजूस निवडुंगी समीक्षक तर दुसऱ्या बाजूस रसरंगी तृप्त रसिक! वाङ्मय मंथनातून निघालेले अमृत वाचक अनुभवतात तर हलाहल समीक्षक हाताळतात.

चिनारवृक्षाच्या उत्तुंगपणाला खुज्या काटेरी निवडुंगांनी वाकुल्या दाखविणे बंद करावे हेच उत्तम!

***– ज. रा. सराफ, अंधेरी (प), मुंबई***



मराठी साहित्याची मराठी माणसाला उत्तम प्रकारे आवड निर्माण व्हावी व त्यामधून मराठी साहित्याचा प्रचार व प्रसार व्हावा या दृष्टीने ग्रंथ जगतद्वारे आपण जे कार्य हाती घेतले आहे ते अभिनंदनीयआहे. हे कार्य उत्तरोत्तर वाढत राहो.

***– सौ. केशरबाई ढालकरी, मानवत (जि. परभणी).***

---

दुसऱ्या वर्षाचा जानेवारी १९९८चा पहिला अंक वाचला. हा तसेच आजवरचे प्रत्येक अंक वाचनीय होते. मराठी साहित्याच्या क्षेत्रातील एक ताजा आढावा आपल्या अंकातून मराठी भाषिक वाचकांपर्यंत पोहचतो. घरोघरी पोहचलेल्या छोटा पडद्यावरील वेगवेगळ्या चॅनल्सवरील कार्यक्रम चोवीस तास माणसाला आळशी बनवून टी.व्ही. पुढे बसविण्याचं काम करीत आहेत. अशावेळी माणसाला वाचायला, चिंतन, मनन करायला लावणं गरजेचं झालं आहे. 'मेहता मराठी ग्रंथ जगत' पत्रिका लोकांत वाचनाची आवड निर्माण करेल अशी आशा आहे.

***– डॉ. इरेश सदाशिव स्वामी, सोलापूर.***

---

आपल्या मासिकाचे अंक कॉलेजमध्ये वाचायला मिळाले. मराठीसाठीचा वाचक वर्ग वाढण्यासाठी हा उपक्रम नक्कीच उपयुक्त ठरेल. संपादकीय व पुस्तक परिचय विशेष आवडले. 'फुले आणि काटे' हे सदरही वेगळे छान वाटले.

***– प्रा. एस्. डी. पाटील, नेसरी, गडहिंग्लज.***

---

नूतनवर्षातील जानेवारी-९८चा पहिला अंक हातात पडला. आणि मन प्रसन्न झाले. साहित्य क्षेत्रात घडणाऱ्या महत्त्वाच्या घटना, साहित्य वार्ता, पुस्तक परिचय, श्रद्धांजली, नवीन स्पर्धा, पुरस्कार, शब्दकोडे अशा अनेक विविध सदरांनी सजलेला 'मराठी ग्रंथजगत'चा अंक आरंभापासून शेवटपर्यंत वाचनीय व संग्रही ठेवण्यासारखा आहे.

***– आतिशकुमार सुरेश सोसे, कानशिवणी, अकोला.***

---

अंकाचे एकूण स्वरुप दर्जेदार आहे. 'फूले आणि काटे' सदर मला विशेष आवडते. जानेवारी १९९८ च्या अंकातील साने गुरुजींविषयी आलेला मजकूर माझ्या वाचनात आला नव्हता. तो इथं वाचताना अंकातील या सदराचं महत्त्व विशेष जाणवलं.

***– अनुराधा औरंगाबादकर, सहसंपादक सा. गांवकरी, नाशिक.***

---

'ग्रंथ जगतचे' अंक नियमितपणे मिळतात. 'सारडा'टचमुळे अंक विशेष वाचनीय झाले आहेत. नवीन पस्तकांची वेळेवर माहिती होते. साहित्यिक जगतातील वार्ताही वळतात.

***– फादर फ्रान्सिस दिब्रिटो, संपादक सुवार्ता, गिरीज, वसई.***